# मरणगंध

## वा. रा. कान्त

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
क्रं. क्र. २५५८

REFBK-0025334

संपूर्ण काव्य

२५५८ २५५८

२५३३८

९।५।८८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५५८
दा. क्र. ९।६।८८
५।५ २५३३८
ग्रंथ संख्या (स्थळ प्रत)

कॉन्टिनेन्टल

महाभारतावरील तीन नाट्यकाव्ये / मरणगंध

## कवी कान्त यांची इतर पुस्तके

### प्रकाशित काव्य

| | | |
|---|---|---|
| पहाटतारा | फटल्कार | रुद्रवीणा |
| शततारका | वेलांटी | वाजली विजेची टाळी |

### अनुवाद

सुल्ताना रझिया ( डॉ. रफीक झकेरिया लिखित इंग्रजी चरित्र )

माणसाची रूपं ( यशपाल यांची हिंदी कादंबरी )

कालचे लखनौ ( अबदुल हलीम ‘ शरर ’ यांचा उर्दू ग्रंथ )

### अप्रकाशित

गभस्तीची झाडे ( काव्य )

बनारसची सकाळ (एकांकिका)

हरवलेले आकाश ( ललित निबंध )

माती आणि मती (काव्यसमीक्षा)

रानो ( राजेंद्रसिंग बेदी यांच्या ‘ एक चादर मैलीसी ’चा अनुवाद )

# मरणगंध

वा. रा. कान्त

REFBK-0025334

REFBK-0025334

कॉन्टिनेन्टल प्रकाशन

मरणगंध

© वा. रा. कान्त
१ / ६८, श्री० सर्वोदय सहनिवास
धामण वाडा, चकाला रोड.
मुंबई ४०० ०५७

या पुस्तकाला महाराष्ट्र राज्य कागद वाटप समितीने
सवलतीच्या दराने कागद दिला आहे, त्याबद्दल आभार

प्रकाशक : अनंत अंबादास कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर कॉलनी, पुणे-३०

मुद्रक : शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय, २९१ शनिवार पेठ, पुणे-३०

मुखपृष्ठ : सौ. पद्मा सहस्रबुद्धे, मुंबई

प्रकाशन क्रमांक : ६९१. सर्व हक्क सुरक्षित

आवृत्ती पहिली, १९७६. किंमत सहा रुपये

मराठवाड्याला साहित्यसेवेची नवी प्रेरणा देणारे
‘ चेतना चिंतामणीचे गाव ’
आणि माझे सहृदय मित्र
**कै. प्रा. भालचंद्र काहाळेकर**
यांच्या स्मृतीस

ग्रंथालय ठाणे
दा. क्र. 2556
9/6/66
25338

**गंधवार्ता**
नऊ ते पंधरा

**मरणगंध**
१

**गांधारी**
११

**विसर्जन**
५५

## आत्म-वार्ता

महाभारतातील काही व्यक्तींच्या मरणघडीवर आधारलेल्या तीन नाट्य-काव्यांचा हा संग्रह आहे. यात मृत्यूच्या क्षणाच्या झरोक्यातून त्यांच्या जीवनाकडं, मागे, दूर पाहण्याचा एक प्रयत्न आहे. मृत्यूच्या क्षणाचा अनुभव गूढ व अगम्य असतो. तसंच अंतकाळची मनोवस्थाही अतर्क्य व अनाकलनीय असते. तरीही मरता बोल खरा, अलिप्त व मानवी अनुभवाचं साकल्यरूपानं दर्शन घडविणारा असतो, असं सामान्यपणे मानलं जातं. अशा अंधाऱ्या, गूढ, गहिऱ्या क्षणाच्या फटीतून दिसणारं जीवन माणसं सांगू लागली, तर ती काय सांगतील व कसं सांगतील त्याचं हे अल्पसं नाट्यरूप दर्शन.

पंडू, माद्री, धृतराष्ट्र, गांधारी आणि श्रीकृष्ण या महाभारतीय व्यक्तींच्या जीवनाचं नाट्यचित्र इथं रेखाटण्यात आलं आहे. परंतु, जीवनाच्या किंवा कलेच्या अंगानं त्याची चर्चा मला इथं अभिप्रेत नाही. या काव्य-प्रकाराकडं मी का व कसा वळलो, याचाच मी फक्त इथं थोडासा शोध घेणार आहे.

गेली पन्नास वर्षे मी काव्याच्या क्षेत्रात वावरत आहे. माझ्या अल्पमतीप्रमाणं बरीचशी भलीबुरी कविता, जशी स्फुरली तशी, मी लिहिली आहे. ही कविता लिहीत असताना मनात सारखं एक असमाधान होतं. त्याबरोबरच, मधूनमधून असंही जाणवत होतं, ही भावकविता छान, सुंदर असते. उत्कट भावनिर्भर असते. त्यात क्षण कसा फुलासारखा फुलतो, दवासारखा झुलतो, कवडशासारखा तळपतो. पण त्यात दर्याचा घोष, गती, किंवा आकाशाची अथांग स्थिती अनुभवाला येत नाही. तसंही काही तरी शोधता आलं पाहिजे. गवसलं पाहिजे. भावकाव्यात अनुभूतीचे क्षण हाती येतात, पण त्या अनुभूतीचं साकल्य गवसलं आहे असं वाटत नाही. ते कुठं मिळेल? अशी मनाला तळमळ होती. त्यातूनच दीर्घ काव्याकडं,

विशेषतः नाट्यकाव्याकडं मी वळलो. सहा-सात नाट्यकाव्यं आणि तीन कथा-काव्यं, १९६२ ते १९७४ या बारा वर्षांच्या काळात लिहिली. त्यांपैकी, तीन नाट्यकाव्यं आज इथं संग्रहित करण्यात येत आहेत. त्यांतून मला काय साधलं, काय साधलं नाही, हे माझ्या रसिक वाचकांनी ठरवायचं आहे. माझ्यापुरतं म्हणाल, तर साधण्या-गवसण्याचा हा प्रश्न गौण आहे; कारण कला ही गवसण्यापेक्षा शोधच अधिक असते. तो शोध, ते असमाधान अजूनही चालू आहे. तोच माझा आनंदही आहे.

या संग्रहातलं पहिलं नाट्यकाव्य 'मरणगंध' पंडूच्या मृत्यूच्या प्रसंगावर लिहिलं आहे. त्याच्या मृत्यूनं मी कुतूहलकातर होतो. एक दिग्विजयी, संयमी आणि वानप्रस्थाश्रम स्वीकारलेला राजा क्षणिक शारीर सुखासाठी मृत्यूच्या खोल दरीत उडी घेतो. का? माणूस वासनेचा गुलाम आहे, एवढंच जर महर्षी व्यासांना सांगायचं होतं, तर त्यात किंदमाचा शाप वगैरेची गुंतागुंत त्यांनी का निर्माण केली? अटळ नियतीपुढची माणसाची अगतिकता दाखवायची असेल, तेव्हा त्या प्रसंगाच्या मागे शाप-उःशापाची एक प्रभावळ बहुधा व्यास निर्माण करतात. त्याची म्हणवणारी मुलं (पांडव) कुंतीची आणि माद्रीची होती. त्याचा संबंध नावापुरताच होता त्यांच्याशी. याची खंत, व्यथा त्याला होती, की भयमुक्त जगण्याचा आनंद हा मरणापेक्षा मोठा आहे असं त्याला वाटत होतं? क्षणाच्या आनंदासाठी मृत्यूला कवटाळणारा पंडू कोणत्या धुंदीनं भारला होता? ते केवळ शारीरिक सुखाचं आकर्षण होतं, की त्यामागं वेगळ्या, सौंदर्याचा वेध घेऊ पाहणाऱ्या कलासक्त जिवाची ऊर्मी होती? समाधिसुखाचा व कामतृप्तीचा आनंद समान असतात असंही प्राचीनांनी म्हणून ठेवलं आहे. मग काही कलात्म, निर्माणशील प्रवृत्तींचं वादळ त्याच्या मनात घुमत होतं, की केवळ जगण्या-मरण्याच्या अपरिहार्य सक्तीनं तो एका माद्रीकडं आकर्षिला गेला होता? पार्थिव व अलौकिक आनंदाची सीमारेषा कुठं संपते व कुठं सुरू होते? पंडूच्या मरणघडीचा विचार करताना अशा अनेक प्रश्नांनी मन अस्वस्थ झालं होतं आणि या अस्वस्थतेला वाट करून देताना जो घाट निर्माण झाला, तेच हे नाट्यकाव्य. प्रथम नाट्यकाव्याचीच कल्पना समोर होती. परंतु लिहिताना असं लक्षात आलं, की सलग नाट्यप्रवेशात मला जे म्हणायचं आहे, ते उमटणार नाही. तरीही लिहिण्याचा प्रयत्न करीतच राहिलो. कुंतीच्या भाषणाच्या काही ओळी लिहिल्यावर कल्पना

सुचली, की कुंती, माद्री आणि पंडू यांची स्वगतं परस्परसंबद्ध ( Link ) होतील, अशा पद्धतीनं लिहिली तर ?– तसं लिहून पाहिलं. नंतर लक्षात आलं की आशयानं आपलं रूप ( Form ) शोधून काढलं आहे. ( ओघात आलं म्हणून इथं हे सांगायला हरकत नाही की, माझे स्नेही प्रा. व. दि. कुलकर्णी यांना माझी ही काव्यकल्पना आकर्षक वाटली आणि ' उत्तम ' दिवाळी अंकासाठी हे काव्य लिहून देण्याचा त्यांनी मला आग्रह चालवला. त्यांचा आग्रह नसता तर कदाचित हे काव्य नेटानं आकार घेऊ शकलं नसतं. )

' गांधारी ' नाट्यकाव्यही एका वेगळ्या कल्पनेतून निर्माण झालं. गांधारीचं पट्टी बांधणं आणि सोडणं या दोन बिंदूंत महाभारताचा सारा संघर्ष पेटला आणि विझला. या पट्टीच्या प्रतिज्ञेमुळं धृतराष्ट्राला असं वाटलं की गांधारीला आपल्या पातिव्रत्याचा कैफ चढला आहे. उलट गांधारीची अशी भावना झाली की, धृतराष्ट्रानं आपल्याला फसवलं आहे आणि भावनेच्या भरात आपण जी प्रतिज्ञा केली त्याचा फायदा घेऊन, तो आपला सूड घेतो आहे, दोघांचे असे पूर्वग्रह व दुराग्रह आणि पोटी आलेले पापग्रह यांच्या संघर्षात शेवटी सर्वांचाच नाश ओढवला. पतीच्या दुःखी जीवनात वाटेकरी होण्याच्या हेतूनं गांधारीनं पट्टी बांधणं आणि गांधारीला स्वाधीन जीवन जगायला मिळावं म्हणून वानप्रस्थाश्रमात, धृतराष्ट्रानं तिला पट्टी सोडण्याचा आग्रह करणं, ह्या दोन्ही गोष्टी अंती निरर्थकच ठरल्या. पट्टी बांधली काय किंवा सोडली काय नशिबात जे लिहिलेलं असतं ते पाहणं टळत नाही. नियतीचा अनावर रथ त्या दोघांच्याही देहावरून धडधडत निघून गेला. नभोवाणीचे लोकप्रिय नाट्यदिग्दर्शक, माझे मित्र व त्यावेळचे नभोवाणीवरचे सहकारी श्री. बाळ कुडतरकर यांच्यामुळं आकाशवाणीसाठी हे नाट्यकाव्य लिहिलं आणि सौ. सुलभा देशपांडे यांनी आपल्या समर्थ आवाजानं त्यातली सारी वेदना जिवंत केली.

' विसर्जन ' हे काव्य प्रसिद्ध चित्रकार व माझे स्नेही कै. दीनानाथ दलाल यांच्यासाठी लिहिलं, पण दैवदुर्विलास असा, की स्वतः त्यांना ते ' दीपावली 'त प्रसिद्ध करता आलं नाही. त्यांच्या निधनानंतर ' दीपावली 'च्या दिवाळी अंकात ते प्रसिद्ध झालं. श्रीकृष्णानं यादवकुलाच्या संहाराबरोबर स्वतःचंही आत्मविसर्जन केलं. ते का केलं असावं ? या प्रश्नाचं चिंतन करीत असताना मला असं जाणवलं, की विसर्जनातही एक सर्जनाचं स्पंदन असतं. सर्जनाचं हे रूप

काव्यात्मक, जीवनव्यवहारापलीकडचं असतं का ? कदाचित असेलही. एवढं मात्र खरं की विसर्जनात सर्जनाचाही अर्थ असतो. तो कधी सापडतो, तर कधी हरवतो. श्रीकृष्णाचं जीवन हे ह्या गवसण्या-हरवण्यातील द्वंद्वाचं मूर्तिमंत प्रतीक. पुर्वायुष्यात तो निसर्गाच्या सहवासात राहिला आणि आदिम जातीचं मुक्त जीवन जगला. पण उत्तरायुष्यात, तो साधूंचं रक्षण व दुष्टांचा नाश करून धर्माची स्थापना करण्याच्या प्रतिज्ञेशी बद्ध झाला. त्यासाठी द्वारकेचं सत्ताकेंद्रही उभारलं. पण शेवटी धर्मसंस्थापनेच्या कार्यातलं त्याचं यश संशयास्पदच ठरलं. घरातच त्याला पराभव स्वीकारावा लागला. ज्या कर्तव्यकर्माचा त्यानं उद्घोष केला, त्याचाच यादवांना विसर पडला. सत्ता-समृद्धीच्या उन्मादात ते यादवी युद्धाला सिद्ध झाले. विनाशाकडं धावत निघाले ( इथंही व्यासांनी गांधारीचा व एका ऋषीचा अशा दोन शापांची पार्श्वभूमी उभी केली आहे. ) उद्विग्न, उदास मनानं श्रीकृष्ण या विनाशाला सामोरा गेला. स्वतःचंही आत्मविसर्जन केलं. ऱ्हासापेक्षा कुलाचा विनाश त्यानं पत्करला.

पण त्याच्या विसर्जनाच्या या अंतिम क्षणाला सर्जनाच्या स्वप्नाचाही स्पर्श होतो. हे स्वप्न राधेच्या रूपानं येतं आणि अंतर्धान पावतं. तशी महाभारतात राधा कुठंच नाही. पण एका अर्थानं राधा हे प्रत्येक तरुण, उमलत्या मनाच्या स्वप्नचं प्रतीक आहे. तसं स्वप्न श्रीकृष्णाच्या जीवनातही असलं पाहिजे. म्हणूनच श्रीकृष्णाच्या पूर्व-जीवनात वास्तव रूपानं आणि शेवटच्या क्षणी स्वप्नरूपात राधा येते, असं मी दाखवलं आहे. नवजीवनाचं फक्त एक स्पंदन राधेच्या रूपानं थरथरून जातं. त्यात सर्जनाचा अर्थ सापडतो का हरवतो, काही समजत नाही. वैफल्याची, नकारात्मतेची कृष्णछायाच त्या क्षणाला शेवटपर्यंत व्यापून राहाते. एकीकडं श्रीकृष्णाचं असामान्य जीवन व दुसरीकडं क्षुद्र व्याधाच्या बाणानं झालेला त्या जीवनाचा सामान्य अंत ह्या घटना कशाच्या निदर्शक आहेत ? महान जीवन आणि क्षुद्र मृत्यू यांच्या दोन टोकांवर, श्रीकृष्णाच्या भव्य जीवनाचंच नव्हे, तर एकंदर मानवी जीवनाच्या नकारात्मतेचं भीषण नाट्य महाकवी व्यासांना रंगवायचं होतं काय ?

श्रीकृष्ण हा अवतारी पुरुष होता की ऐतिहासिक पुरुष होता, यापेक्षा त्याचं असामान्य चरित्र हे ' मिथ 'च्या पातळीवर जाण्याइतकं विशाल, कालातीत व विविधार्थसंपन्न आहे, यात मला काव्यदृष्टीनं अधिक रस आहे. त्यामुळं त्याच्या

नकारात्मतेच्या नाट्यालाही शेवटी नवनिर्मितीचा शलाकास्पर्शही होतो. त्याचं जीवन ' अकाल कल्पने 'सारखं जाणवतं, पण सापडत नाही— ' शून्यापासून निःशून्यापर्यंत. '

ही तिन्ही काव्यं महाभारतातील घटना-प्रसंगांवर व व्यक्तींवर आधारली आहेत हे एकच समान सूत्र त्यांत नाही, तर जीवनातील वैफल्यात्मक अनुभवाचा एकात्म प्रत्यय त्यांतून येतो. माझ्या काव्यविषय झालेल्या व्यक्तिरेखा निरनिराळ्या थरांतल्या आहेत. काही असामान्य आहेत, तर काही सामान्य; काही कर्तव्य-भावनेनं प्रेरित व विशाल व्यक्तिमत्त्वाच्या, तर काही आकुंचित व कुंठित वृत्तीची क्षुद्र माणसं आहेत. त्यांचे प्रकृतिधर्म निराळे असले, तरी आपापल्या प्रकृतिधर्मा-प्रमाणे जिद्दीनं ते नियतीशी झगडत राहतात, त्यात पराभूत होतात आणि शून्याच्या अंधारात विरून जातात. पंडूचा सौंदर्यानंदाच्या सुखाचा अनुभव मृत्युरसात विरघळून जातो. गांधारीची पुत्रांच्या व कौरवांच्या राज्यपदाची धड-पड विनाशाच्या धुळीत मिसळून जाते आणि ती स्वतः व धृतराष्ट्र, रानातल्या झाडाझुडपांप्रमाणे वणव्यात जळून भस्म होतात. तरीही प्रत्येकजण मरणापर्यंत आणि मरणातही आपली शान सांभाळून असतो. मृत्यूनंतर त्यांच्या झुंजीच्या रेखाकृती विजेच्या रेघोट्यासारख्या अज्ञाताच्या गडद अंधारावर मधून मधून चमकत राहातात.

श्रीमद् व्यासांनी सुरुवातीला आपल्या महाभारत ग्रंथाला ' जय ' नावाचा इतिहास म्हटलं आहे. परंतु भारतीय युद्धाच्या समाप्तीनंतर, या ग्रंथाच्या अखेरीस धर्मराजाच्या तोंडी जे उद्गार घातले आहेत, ते याला पूर्ण विरोधी आहेत: ' जयोऽयमजयाकारो भगवन् प्रतिभाति मे । ' महाकाव्य लिहितांना अगदी शेवटी व्यासांच्या अनुभवविश्वात झालेला बदल, जीवनाचा अंतिम प्रत्यय या उद्‌गारात व्यक्त झाला आहे असंच म्हणायचं का ? महाभारताची शोकात्म लय असाधारण आहे, असं दुर्गाबाई भागवत म्हणतात ते यामुळंच काय ? इरावती कर्वे यांनीही आपल्या ' युगान्त ' ग्रंथात अशाच अर्थाचे उद्‌गार काढले आहेत. माझ्या दृष्टीनं या महाकाव्यातल्या व्यक्ती म्हणजे मरणाच्या सावलीत फुलणारी निबिड कांतारातली अशी जीवनपुष्पे आहेत, की ज्यांना मरणाचा मंद गंध अखंड येत राहतो. हे मृत्युतत्त्वच जीवनाचा अखेरचा अर्थ आहे का ? पण हा प्रश्न मनात उपस्थित होत असतानाच, माझ्या कविमनाला असंही वाटतं की हे

तितकंसं खरं नसेल. या गळणाऱ्या फुलांच्या पाकळ्यांत, त्यांच्या गंधकोषात, कुठं तरी फळही लपून बसलं असेल आणि ते विजनातल्या या फुलांच्या हाकेला ' ओ ' देईल, अशी जीवनासंबंधीची श्रद्धा कविवर रवीन्द्रनाथ ठाकुरांनी एका कणिकेत व्यक्त केली आहे. त्यांचा हा अदम्य रोमँटिक आशावाद महाभारताच्या कठोर वास्तवापेक्षा मला अधिक जवळचा वाटतो. का ? माझ्या मनात जाणवलेला अनुभवार्थ तसाच आहे : गुलाबाच्या फुलांवर उन्हात चमकणाऱ्या कोळिष्टकाच्या कलाबतूसारखा. कोळिष्टकाचं सोडा; पण ते फूल, ते ऊन क्षणभरासाठी का होईना खरं आहे ना ?

या काव्याचं लेखन करीत असताना मला असं वाटत होतं, की अनुभवाचा अज्ञात पट आपल्यासमोर उलगडत आहे. जीवनाचा सागरघोष ऐकू येत आहे. महाकवी व्यासांच्या वाणीचा पडसाद आसमंतात उठत आहे. 'ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष नच कश्चित् शृणोति माम् ' लेखनसमयीचा हा अनुभव, हा आनंद मला फार मोठा, मोलाचा वाटतो. त्या मानानं या शब्दाकृतीला दुय्यमच स्थान आहे.

आजकाल जीवनात एवढ्या प्रचंड घडामोडी घडत असताना मी भूतकाळात, पुराणात का धडपडतो, असा प्रश्न माझ्या वाचकांच्या मनात येणे साहजिक आहे. तूर्त त्यांना मी एवढंच सांगू इच्छितो, की जीवनमरणाची एवढी विविध व विशाल परिमाणं, ' मिथ'च्या लयीला स्पर्श करणारी अर्थसघन परिमाणं, आजच्या धकाधकीच्या यांत्रिक व दुभंगलेल्या जीवनात मला आढळली नसतील !

गांधारी व श्रीकृष्ण यांच्या व्यक्तिरेखा साकार करताना कै. इरावती कर्वे आणि श्रीमती दुर्गाबाई भागवत यांच्या लेखांचा मला आधार मिळाला, हे मी कृतज्ञतेनं नमूद करीत आहे. मराठवाडा विद्यापीठाचे भूतपूर्व कुलसचिव प्रा. म. भि. चिटणीस यांच्याशी झालेल्या अनौपचारिक काव्यचर्चेतूनच दीर्घ काव्याची कल्पना प्रथम माझ्या मनात रुजली. त्यांनी या प्रकारच्या काव्यलेखनाला प्रथम प्रोत्साहन दिलं. अशा काव्यप्रकारातून प्रकट होणाऱ्या अनुभवांच्या कक्षांची जाणीवही मला झाली. डॉ. व. दि. कुलकर्णी आणि बाळ कुडतरकर यांचेही मला आभार मानले पाहिजेत. कै. दीनानाथ दलाल यांचीही या वेळी मला तीव्रतेने आठवण होते. या सर्व मित्रांच्या प्रेमळ व रसिक प्रोत्साहनातून मला लेखनाचं बळ मिळालं आहे.

महाभारतावरची ही नाट्यकाव्यं संकलित करण्याची कल्पना कॉन्टिनेन्टलचे श्री. अनंतराव कुलकर्णी यांची आहे. त्यांच्या या स्नेहशील सूचनेबद्दल व ती पुस्तकरूपाने सिद्ध करण्यासाठी त्यांनी जे सहकार्य दिले त्याबद्दल त्यांचाही मी आभारी आहे.

**—वा. रा. कान्त**

# मरणगंध

# कुंती

तिच्या सरस-आरस मांड्यांत तो मरून पडला होता
आणि तिला रडू फुटत नव्हतं;
फुलत होतं मरणातही एक अद्भुत स्मित
राजाच्या मुखावर, जे बघता बघता
तिच्या डोळ्यांत दाटत होते अश्रूच आनंदाचे;
विसावला होता तिच्या कुचमंडलावर त्याचा एक हात
पिवळ्याजर्द आंब्यावरील शुष्क डहाळीसारखा;
सुखानं जड झालं होतं तिचं शरीर,
अजूनही फुलतच होते स्पर्शफुलांचे घोस
तिच्या अंगांगावर रोमवेलींतून;
दंशून झोपला होता फुंफाटणारा भुजंग
तिच्या पाठीच्या पन्हाळीत;
चढत्या विषाच्या गुंगीत कळत नव्हतं तिला
अंतर जीवन-मरणातलं;
धन्य आहे बाल्हिकी, तुझी
इतकी वर्षं सांभाळलं मी पंडुराजाला
पण शेवटी घात केलास तू,
मद्रराजकन्ये, हेवा वाटतो- या दुःखातही- तुझा मला
शेवटी तूच पाहिलास तो तृप्तीचा आनंद
राजाच्या मुखावरून ओसंडणारा,
घामानं डवरणारा, चांदण्यानं बहरणारा,
छान एकांत साधलास, त्याला भुलवून

कसा घात केलास जाणूनबुजून,
देवा, निष्ठुरा, कसा निर्मिलास मरणगंध
हासऱ्या फुलांतच सुंदराच्या !
माद्री, चांडाळणी !—

## माद्री

मी ?– मीच चांडाळीण !
खरं आहे बाई, तुमचं म्हणणं
कशाला– कशाला केला मी तो श्वेतशृंगार ?
जुईच्या फुलांची ती शुभ्र वेणी,
ती शुभ्र कंचुकी, अनावृत करणारी
झाकता झाकता गौर उरोजांना,
बर्फाचा– हर्षाचा तो शुभ्र पारा,
वितळणारा पर्वतावरून
अंधाराला गुदगुल्या करणारी मंद उन्हे शुभ्र पिसांची
पिसारा पांढरा फुलवून नाचणारा
लांडोरींना भोती भोती घुमवणारा
पांढरा शुभ्र, आनंदघन, उन्मत्त मोर,
क्षितिजावरून तरंगत येणारे
आनंदाला हुरहूर लावणारे
कापूरवड्याचे पांढरे मेघ,
श्वेतसुंदर सकाळ पेटत्या कापराची !–
यांनी – यांनीच ही आग लावली,
पांढऱ्या रंगांनीच ही करणी केली,
भुरळ पाडली मला– मीच चांडाळीण !
महाराज, मीच आपला घात केला
वनात आलात राज्यत्याग करून

शापित जीवन सुखाचं करण्यासाठी
आणि मी दुष्टेनं तुम्हाला मारलं
या वनात आणून, खरंच महाराज,
किती स्वार्थी मी, दुष्ट, हत्यारी ! –
देवा ऽ —

पंडु

नाही, माद्री, तू हत्यारी नाहीस
प्रिये, माझा तू घात केला नाहीस,
मुक्त केलंस मला मरणभयातून;
कुंती, मला नीट समजावून घे
मृत झालो आहे मी लौकिकात
मृण्मयापासून वेगळा झालो आहे;
राग–द्वेष हे मातीचे गुण
सुटले आहेत आता माझ्यापासून
जळला तो कापूर, उरला तो सुवास !
खरं सांगतो कुंती,
माझीच इच्छा होती ती,
पण ती वासना नव्हती
देहाची केवळ आंधळी असोशी नव्हती
आत्म्याची हाक होती ती !
कुंती, तुला तीन पुत्र झाले, माद्रीलाही दोन मुले झाली,
पण त्यांत माझे एकही मूल नव्हते
सृजनाची माझी आकांक्षा अपुरीच राहिली होती
आपलं अस्तित्व चिरंजीव करण्यासाठी
आत्मप्रतिमा निर्माण करून,
काळाला, संहाराला आव्हान द्यायचं होतं मला

पार्थिवाची ही अनिवार जिद्द,
अशाश्वताला शाश्वताचं हे आव्हान
अपार्थिवाला पार्थिवाचं हे आश्वासन
म्हणजेच मानवी कामवासना
तारकासुरापासून स्वर्गाला वाचवण्यासाठी,
देवांना उत्पन्न करावा लागला काम
शंकराच्या मनात !
परंतु मला भय वाटत होतं
त्या कामाचं, त्या आव्हानाचं—
किंदमाचा शाप माथ्यावर घुमत होता :
अश्वाचं रूप घेऊन, पशु होऊन,
पार्थिवाला भिऊन, निसर्गाला लाजून,
सुंदराचा तिरस्कार करून—
(अजूनही माणसं हेच करतात)—
हा मुनी आपली वासना तृप्त करीत होता
एका अश्विनीबरोबर,
मृगया केली त्याची मी, नकळत, अजाणता
त्या अतृप्त कामानं शापलं मला संतापानं,
" संभोगातच तूही मरशील—माझ्यासारखा ! "
तेव्हापासून स्त्रीला मी भिऊ लागलो
दूर दूर राहू लागलो
परंतु या भयानं
अपूर्ण, खुरटं होऊ लागलं जीवन,
मी जगत होतो, की फक्त मरण टाळीत होतो ?
पण जगणं म्हणजे मरणाला टाळणं नव्हे
जगण्याचा माझा सारा विचार,
जीवनाचा सारा अर्थच इथं संपुष्टात येत होता,
नष्ट होत होता; वाळणाऱ्या, वठणाऱ्या डहाळीसारखा;

२५५५ २५३३४ काव्य ७।५।८८

आणि हा विचार जिथं संपतो,
तिथं सुरू होतो, उद्भवतो काम
रक्ताच्या उसळीसारखा
पौरुषाच्या लहरीसारखा :
जिच्यामुळं अंधाराच्या नसांतून तेज फुटून येतं
फांदीच्या हिरव्या शिरांतून फूल उमलतं.
त्याच शक्तीनं फुलून आला कण कण माझ्या देहातला.
नष्ट झाली माझी मरणाची भीती
धुंद दर्शनानं, हिच्या–माद्रीच्या मादक सौंदर्याच्या
भयमुक्त झालो मी !
सौंदर्यापुढं गळून जातं, जळून जातं मरणाचं भय,
नंतर झेपावतो पतंग ज्योतीवर,
किती सुंदर, किती अपरिहार्य
दहनाभिलाषा ही पतंगाची !
प्रत्येक पुरुषात मरतो रोज एक पंडु,
अतृप्त काम; सती जाते माद्रीही
रोज रोज प्रत्येक स्त्रीमध्ये,
समजून घे मला कुंती,
माद्रीचा काही दोष नाही
कुंती, काही दोष नाही
काही दोष नाही–

## माद्री

' सती जाते माद्रीही रोज रोज
प्रत्येक स्त्री मध्ये '–
महाराजांचाच शब्द हा. इथंच.
इथंच गुंतून पडले आहेत अजून

माझ्या आशेनं; थांबा, महाराज, थांबा,
ही मी आलेच एका क्षणात
सौंदर्यानं नष्ट होते मरणाची भीती,
म्हणून मरण टळत नाही.
ते टळलं असतं तर ?–
तर मग सारं माधुर्यच नष्ट झालं असतं
जीवनातलं, स्वप्नातलं;
मरणाच्या देठावरच फुलतं फूल
स्वप्नाचं, सौंदर्याचं !
आज सकाळी हेच घडलं, असंच घडलं :
वसन्ताची उन्हं पसरली पर्वतावर,
वितळू लागलं शिखरावरचं बर्फ;
टेकड्याटेकड्यांतून ठसठसू लागली
पाण्यातून पाझरू लागली
विरही युगुलांची उत्कंठा— वेदना,
डोंगरदऱ्यांतून अवघडलेली;
फांद्याफांद्यांवर फुलांचे बाण चढले
गाणे पक्ष्यांच्या गळ्यांत दाटले
महाराजांचंही मन अनिवार झालं
मला किंदमाचा शाप आठवला
भीतीनं काळजाचा थरकाप झाला
मी नको नको म्हणत होते
पण हेच ऐकेनात—
शंकराला दिलेलं मदनाचं आव्हान,
फळासाठी गळणाऱ्या फुलाची निर्भयता,
दिव्यावर झेपावणाऱ्या पतंगाचं वेड,
सारं, सारं महाराजांच्या अंगात संचारलं
पण, नंतर स्वतःच आवेगानं थरथरू लागले

त्यांना माझ्या बाहूंत मी कवटाळून धरलं
घाम पुसला ओठांनी त्यांच्या कपाळावरला
बोटं फिरवली त्यांच्या केसांमधून
त्यांचा सुगंध श्वासांत भरून घेतला
अगदी श्वासानं प्याले घटघटा
तो अनावर, उद्दाम मरणगंध !
अन् त्या सुगंधातून मी त्यांच्या अंतरात्म्यात शिरले
त्याच क्षणी विंधून गेले, भेदून गेले
ते माझा देह
मेघांत शिरणाऱ्या शलाकेप्रमाणे
विदेहाच्या वेगळ्या विश्वात;
शतचंद्र माझ्या डोळ्यांत उगवले
ओटीपोटांतून चांदण्याचे पाट वाहू लागले
फुलांनी डवरला कुंजातला अंधार
झुलू लागलो आम्ही सूर्य-किरणांवर
खाली - वर, खाली - वर
देहाचं गुरुत्वाकर्षण हरवून
केवळ उन्हे होऊन;
झुलता झुलता मी घामानं न्हाले,
त्यांच्या मुखावर तळपू लागली
एक नवी तृप्ती, एक नवा आनंद :
हजार चंद्रबिंबे पाण्यात हेलावणारी
पाझरले चंद्रमण्याचे माझे अंग अंग
आनंद, आनंद, अवघा आनंद
मुक्त झाले महाराज घोर शापातून, मरणाच्या भयातून;
हरवल्या दिशा, हरवला काल
त्वचेच्या रानात,
बेफाम क्षणात आत्मविसर्जनाच्या :

क्षण तो शहारता तीक्ष्ण पोलादाचा
चांदण्याच्या धारेचा
पार्थिवाच्या जयाचा—
जिंकले मरणाला
सुखानं क्षणभर मी डोळे मिटले
आणखी उघडले :
विलगच राहिले क्षितिजाचे विस्मित ओठ
लज्जित आरक्त अधरापासून पुरातन पृथ्वीच्या;
पहिलं चुबंन पृथ्वी-आकाशाचं अपुरंच राहिलं
पाण्यात चंद्रबिंब विरघळून गेलं
अंगांवर कोसळलं
फुलांनी फुलणारं झाड, ऊर्ध्वमूल !
आक्रोशू लागली
उमलणारी. फुलणारी
अव्यय फुलं माझ्या देहातली
की माझ्या चितेतली
उद्याची, पेटती !

# गांधारी

## प्रवेश पहिला

**स्थळ** – हिमालयाच्या शिखरांच्या कुशीतला एकांत आश्रम. पर्णकुटीच्या मागे हिरवे देवदार वृक्ष; भोवती बर्फाने झाकलेली उत्तुंग शिखरे, शुभ्र, मौन; लांब झऱ्याची खळखळ; खोऱ्यातून ढगांचे पुंज तरंगत वर येत आहेत. पाण्याच्या आवाजाबरोबर हिरव्या झाडांत वाराही वाजत आहे. बाकी सारे स्तब्ध नीरव.

**पात्रे** – धृतराष्ट्र आणि गांधारी

धृतराष्ट्र पर्णकुटीतून बाहेर येऊन ओट्याला धरून चाचपडत पुढे येतो आणि त्या झाडाच्या पारावर बसतो. आकाशाकडे पाहात. दृष्टिहीन डोळे चाळवीत काही हातवारे करतो. उगीचच स्वतःशी पुटपुटतो. काही साचल ऐकून मागे वळतो. मन अस्वस्थ, हालचाली अस्थिर, चेहऱ्यावर आठवणींचा ताण. ओट्यावरील झाडाच्या मागच्या बाजूने गांधारी येते. एका हाताने झाडाच्या बुंध्याला टेकून उभी राहते. हात अस्वस्थपणे झाडाच्या बुंध्यावर फिरत असतो. अंगावर शुभ्र पातळ, डोळ्यावर एक काळी पट्टी. तिच्या पायांचा आवाज ऐकून धृतराष्ट्र आपले उत्तरीय खांद्यावर नीट सावर तो. मग एकदम बोलतो–

**धृतराष्ट्र** – कोण ?– विदुरराज ?– कुंतीवहिनी ?–
कोण आहे तिथं ? कुणाची पावलं वाजली ?

**गांधारी** – कुठं कोण आहे ? मीच आपली–
मी– गांधारी.

**धृतराष्ट्र** – गां–धा–री– ? तू ?

**गांधारी** – हो, मीच. गांधारी माझं नाव !
पण माझा गांधार
कधी लागलाच नाही
कंठात कधी तो फुललाच नाही.
**धृतराष्ट्र** – कसा लागेल, कसा फुलेल गांधारी,
तो गांधार ?– मूग गिळून बसल्यावर,
डोळे मिटून घेतल्यावर ?
**गांधारी** – वरून डोळे, महाराज, खरंच मिटले होते
पण अंतरात्म्याचा डोळा ! तो उघडाच होता.
**धृतराष्ट्र** – काय, अंतरात्म्याचा डोळा !
हं: काय उपयोग आहे !
बाहेरचे डोळे मिटतात, तेव्हा
झाकले जातात अंतरात्म्याचेही डोळे–
प्रकाश नाकारणारे डोळे
ते चालवतात अंधाराचीच मिरास !
**गांधारी** – अंधाराची मिरास ! पण स्वामी,
अंधाराचाच गाव तुम्ही आंदण दिला होतात मला !
**धृतराष्ट्र** – अंधाराचंच राज्य घेऊन,
मी जन्माला आलो
माझ्या गर्भसंभवाचे वेळी
घाबरून डोळे मिटले
माझ्या आईनं
त्या भयाचं, त्या क्षणाचं
आंधळेपण घेऊन
मी जगात आलो
माझं क्षितिज आंधळं
माझा सूर्य आंधळा
फुलंदेखील आंधळी माझी.

वाटलं – वाटलं होतं ही
माझी आंधळी फुलं
डोळे उघडतील
नाही तरी फुलाला फूलपण येतं
ते देखण्या, सुंदर फुलांच्या
डोळ्यांमुळंच
पण ते डोळे तू मिटून
घेतले होतेस.

गांधारी – नाही. आरंभी उघडेच
होते माझे डोळे
दवांनी न्हालेल्या फुलांसारखे
सूर्याची स्वप्ने घेऊन येणारे
स्वप्नांचा सुगंध भरून ठेवणारे
मनाच्या फुलाफुलांत– पण, पण–

धृतराष्ट्र – पण– असं काय झालं ?
झालाच ना संसार ?
दोन आंधळ्यांचा व्हावा तसा.

गांधारी – झाला झाला, नको इतका झाला.
पण जाऊ द्या महाराज, कशाला ती उजळणी ?
हूं: ऽ ( सुस्कारा टाकते )

धृतराष्ट्र – का ? का हा सुस्कारा ?
का हा दीर्घ निःश्वास ?
वाईट वाटतं आंधळ्याशी लग्न झालं म्हणून ?

गांधारी – त्याचं नाही वाईट वाटत.
वाईट वाटतं खरीखुरी आंधळी झाले नाही, याचं.
साठ वर्षांत हीच का पारख केलीत ?
त्यासाठी नाही सुस्कारा टाकला
अन् टाकून तरी काय उपयोग ?

जिथं सारं जीवनच झालं आहे एक दीर्घ निःश्वास,
दीर्घ उसासा
एका युगांताचा

**धृतराष्ट्र** — युगांत ! होय तेही खरंच
अंत झाला एका युगाचा
आणि त्याच्या भुताच्या सावल्यांसारखी
आपण बसलो आहोत या शुभ्र हिमालय पर्वतावर !

**गांधारी** — काही तरीच काय ? इथं भुतं कशी राहतील ?
ही स्वर्गभूमी, देवदेवतांचं निवास्थान हे.
पट्टी बांधली म्हणून,
नाही तर मी तुम्हांला दाखवली असती
श्रीशिवभवानीची पावलं, इथं उमटलेली.

**धृतराष्ट्र** — त्यांचीच तर मी वाट पाहात आहे.
पण अद्याप नाही दिसली, कुणी दाखविली नाहीत
बरं ते जाऊ दे, काय म्हणालीस ?
ही स्वर्गभूमी काय ? देवदेवतांचं निवासस्थान !
छान् ! म्हणजे आपणही देव झालो की अनायास !

**गांधारी** — हो तर ! झालात देव !
आधी खाली पाहा पायाकडं, ते माखले आहेत,
अठरा अक्षौहिणी सैन्याच्या रक्तानं
अन् धमन्यांतून दाटलं आहे मृगजळ
महत्त्वाकांक्षेचं, हस्तिनापुरीच्या साम्राज्याचं !

**धृतराष्ट्र** — अन् तुझ्या डोळ्यांत मिटली आहे खोटी खंत
पांडवांच्या वनवासगमनाची,
द्रौपदीच्या वस्त्रहरणाची
खोटी लाज—

**गांधारी** — आणि तुमचं तरी काय ?
पांडवांच्या सूडाचा डोंब अजून उरात उसळतो आहे

अंगाला लागलं आहे पाहा, अजून भस्म
चूर्ण केलेल्या भीमाच्या लोखंडी पुतळ्याचं
ते पुसा आणि मग सांगा,
तेवढं पुण्य आहे का पदरी ?

**धृतराष्ट्र** – नसू दे, नसू दे, पण इथं आलं की वाटतं
आपण देवच आहोत, ' देवातात्मा ! '
उगीच नाही म्हटलं त्याला हिमालय ! अहाहा !

**गांधारी** – हिमालय –हिमगिरी !
खरंच किती सुंदर असेल नाही हा पर्वत !
बर्फानं झाकलेली उंच शिखरं
अंगाला स्पर्शणारे धुक्याचे रेशमी पदर,
विसरलेल्या हास्यासारखे, खळाळणारे, मुक्त निर्झर,
वाऱ्याच्या मनातील स्वप्नासारखा मंद सुगंध
देवदारांचा,
आणि हिरवीगार सूचिपत्रं
क्षणात कुजबुजणारी,
तर क्षणात सुस्कारणारी ! –
त्या पानांवरून निथळणारी गुलाबी उन्हं :
माझ्या शंभर पुत्रांच्या मुखांवरून ओसंडणारी
कोवळी हास्यं;
खोल दऱ्यांतून क्षितिजाकडे झेपावणारे
शुभ्र पुंज मेघांचे !
अज्ञात संकल्प विश्वात्म्याचे तरंगणारे !
किती सुंदर असेल हे सारं !
वाटलं, वाटलं ही डोळ्यावरची
बांधलेली जन्माची पट्टी सोडावी,
मोडावी प्रतिज्ञा, अन् डोळे भरून पाहावं
हे सारं सुंदर जग, आपल्या मोडलेल्या व्रतासह !

तो व्रतभंगही सुंदर असेल नाही ?

**धृतराष्ट्र** – सुंदर, असुंदर, प्रतिज्ञा, व्रतभंग !
कशालाच काही अर्थ उरला नाही
व्रतभंगही सुंदर ठरला असता गांधारी,
पण तो क्षण आता फार दूर गेला आहे.
आता उरले आहेत हिरवे सुस्कारे,
केवळ देवदारांचे !

**गांधारी** – देवदारांचे सुस्कारे, तीक्ष्ण टोकदार, हिरवे
हिरवेगार !
ते ऐकूनच मीही सुस्कारा टाकला. नकळत,
माहेरची आठवण झाली असावी मला

**धृतराष्ट्र** – म्हणजे ! गांधारी, तू अजून पोळतेस
माहेरच्या आठवणींनी ?

**गांधारी** – नाही, स्वामी, मुळीच नाही,
पुन्हा चुकलात आपण
माझी स्मृती चाळवली या हिरव्या सूचिपत्रांनी
उठली बारीक कळ, आठवण झाली मला
ती माहेरच्या माणसांची नव्हे,
गांधारच्या प्रदेशाची, माझ्या जन्मभूमीची
लाजाहोमाची ज्वाला
फुलवली मी फुंकरीनं, त्या क्षणीच
जाळून टाकली, त्या लाह्यांबरोबरच, माझ्या
माहेरची आठवण,
भावाशीही कधी बोलले नाही
महालातल्या महालात राहून,
पण अक्रोडाचे ते विशाल वृक्ष,
त्यांच्या घनदाट छाया, तुरट-हिरवे-कच्चे बदाम,
पानजाळीतून झळकणारे लाल केशरी दिवे,

पक्क्या सफरचंदाचे
अजूनही मला बोलावतात, साद घालतात
या भग्न एकाकी जिवाला,
शंभर मुलांच्या मृत्यूचे स्मशान झालेल्या
या उद्ध्वस्त हृदयाला !

**धृतराष्ट्र** – बरंच दिसतं की या माझ्या ' पट्टीच्या ' आंधळीला
अक्रोडांच्या छाया,
फळांचे रंग, सफरचंदांच्या ज्योती !–

**गांधारी** – दिसत नाहीत, ऐकू येतात स्वामी,
ऐकू येतात रंगाचे नाद, प्रकाशाचे ध्वनी–
सारी सुखं, सारी, स्वप्नं रचीत आले मी,
शब्दांच्या रेघांनी ध्वनींच्या रूपांनी :
शंभर पुत्रांना जन्म दिला मी
पण त्यांना मी पाहिलं नाही, फक्त ऐकिलं.
त्यांचं हसणं, त्यांचं रडणं,
त्यांचे जयनाद, त्यांचे आनंद-कल्लोळ,
त्यांचं आक्रंदन, आणि शेवटी–
त्यांच्या मरणाच्या किंकाळ्या–शंभर किंकाळ्या !
एक नव्हे, दोन नव्हे, शंभर किंकाळ्या ! –

**धृतराष्ट्र** – शांत हो, गांधारी, शांत हो,
थोडा विचार कर, ही विपत्ती, ही दुःखं
तुझी तूच ओढवून घेतली नाहीस का ?
ह्या तुझ्या आंधळेपणाप्रमाणे—

**गांधारी** – नाही, नाही, महाराज, हे आंधळेपण –
मी माझ्यावर ओढवून घेतलं नाही,
लादण्यात आलं ते माझ्यावर.

**धृतराष्ट्र** – लादण्यात आलं ? कुणी लादलं ?

**गांधारी** – तुम्ही ! तुम्ही लादलंत ते माझ्यावर.

धृतराष्ट्र — मी ? मी लादलं ?
गांधारी — हो, तुम्हीच लादलंत,
फसवलंत तुम्ही मला;
असह्य फसवणूक. अघोर वंचना,
साऱ्या दिशा झाकोळल्या
दिवे विझले, फुले मिटली, मिटले माझेही डोळे
गच्च–गच्च !–भयानं
विस्मयानं, भविष्याच्या भयाण जाणिवेनं.
फुलांचं हसणं बघवलं नाही
डोहातलं चांदणं पाहवलं नाही;
त्या फुलांत साप फुंफाटत होता,
विषदंत शिवशिवत होता ! चांदण्यात
का केलात माझा असा विश्वासघात ?
धृतराष्ट्र — विश्वासघात !—
मी केला नाही, मी केला नाही गांधारी,
मीच शोधीत होतो विश्वास
कुणाच्या शब्दांत, कुणाच्या स्पर्शात–
गांधारी — शब्द, स्पर्श ! महाराज,
सारंच खोटं, सारंच फसवं.
शब्द कानाशी संपतो
स्पर्श त्वचेशी थांबतो
पुढे हृदयात सारा अंधार, निःशब्द निर्जन अंधार !
अजून, अजून, आठवते ती दुपार
हस्तिनापुरीची, पिवळ्या केतकीची
धुंद, सुस्त, आळसावलेली उन्हं
फांद्याफांद्यातून लोंबत होती,
मोत्यांच्या मुंडावळ्यांसारखी !
तटाशी यमुना पेंगत होती

राजकारणानं बळी घेतला ग तुझा !
बळी घेतला

गांधारी – राजकारण? राजकारण होतं ते!
मुलीचं लग्नकार्य! धर्मकार्य–नव्हतं ते?
तरी पण का सांगितलं नाही–का? अं?–
मी बाबांना विचारते, दादाला विचारते,
प्रत्यक्ष भीष्मपितामहांना विचारते,
मला का सांगितलं नाही?

अलकावती– राजकुमारी, का ते कळणार नाही
अन् ते कुणीच सांगणार नाही.
बाळे, अजून तू लहान आहेस,
पराधीन असतो स्त्रीचा जन्म
पुरुषांनी करावं आणि आम्ही भोगावं
हेच स्त्रियांचं जीवन. पुन्हा –
कोण कशाला सांगतील?
आम्हीच शोध घ्यायला पाहिजे होता,
ते आम्हीच आंधळे बनलो;

गांधारी – कशानं?
त्यांच्या संपत्तीनं? त्यांच्या वैभवानं?
की, त्यांच्या राजविलासी मधाळ शब्दानं?
वस्त्रांच्या भेटी ! रत्नांचे नजराणे !—
मला काय माहीत त्यांचेही डोळे
दृष्टिहीन आहेत त्या तेजाळ रत्नांसारखे !–
की, ते डोळेच मदांध आहेत, आंधळे झाले आहेत,
सत्तेच्या कैफानं, बळाच्या, पराक्रमाच्या
अहंकारानं !
नाही, त्या दृष्टिहीन रत्नांना,
मदांध डोळ्यांना, नाही – नाही—

मी अशी शरण जाणार नाही,
वाकणार नाही ह्या अंध बळापुढं
गांधारराजकन्या
जा, अलकावती, जाऊन सांग त्यांना :
मी अंधाशी लग्न करणार नाही.
होणार नाही हे लग्न.

**शकुनी** – ( प्रवेशून ) कोण म्हणतो हे लग्न होणार नाही
म्हणून ?
हे लग्न झालंच पाहिजे,
होऊन राहील.

**गांधारी** – काय दादा ? काय म्हणतोस हे शकुनीदादा ?
अरे, मी काय फासा आहे द्यूताचा ! दादा,
तुझ्या हातातला,
तुझ्या इच्छेप्रमाणे पडायला !
म्हणे हे लग्न झालंच पाहिजे !
कोण तू लग्न करणार माझं ? माझ्या मनाविरुद्ध ?
नाही, शक्य नाही ते.
मी आंधळ्याला वरणार नाही.

**शकुनी** – वरणार नाहीस तू आंधळ्याला ?

**गांधारी** – नाही. माझी इच्छा नाही.

**शकुनी** – गांधारी, कोण विचारतो तुझ्या इच्छेला ?
स्त्रीला स्वतःची इच्छा नसते
ती असते स्वतःच नुसती इच्छा :
एखाद्या पित्याची, एखाद्या भावाची,
किंवा अज्ञात पतीची वा अजात पुत्राची ! -
नुसती इच्छा, मुकी अजाण !
गांधारी, करावंच लागेल तुला हे लग्न
शब्द दिला आहे मी कौरवांना.

**गांधारी** – असशील दिला शब्द तू कौरवांना,
भाळला असशील तू त्यांच्या वैभवाला !
भ्याला असशील तू त्यांच्या सामर्थ्याला !
पण दादा, विवाह माझा आहे, मान्य नाही
मला तो,
शरण जाणार नाही मी अशा वंचनेला
तुझ्यासारखी !

**शकुनी** – शरण ! वंचना ! व्यर्थ, निरर्थक शब्द !
स्वतःचा अर्थच नसतो ह्या शब्दांना
दुबळ्यांना जी वंचना वाटते, तो–
तो अधिकार असतो समर्थांचा.
हूं : वंचना – कसली वंचना ?

**गांधारी** – वंचनाच नाही तर काय दादा ?
तुला हे माहीत होतं साखरपुडा होण्यापूर्वी ?
खरं सांग, दादा.

**शकुनी** – हो, गांधारी, मला हे माहीत होतं.

**गांधारी** – हाय रे दुर्दैवा ! त्याला हे माहीत होतं !

**शकुनी** – गांधारी, मला हे माहीत होतं,
तू सम्राटाची राणी होणार आहेस,
हस्तिनापूरची सम्राज्ञी !
इंद्राणीनंही हेवा करावा असं वैभव
अशी सत्ता – तुला मिळणार आहे,
हे मला माहीत होतं –
अंध असला म्हणून काय झालं ?
तुझ्याच हाती येणार आहे सारी सत्ता.
त्या आंधळ्यासह ! नाही, तसं नाही.
मला म्हणायचंय सत्ता तशी थोडी आंधळीच असते !
नाही का ? सम्राटाचा साखरपुडा !

गांधारी, मोठी भाग्यशाली आहेस तू.
साऱ्या साम्राज्याचा साखरपुडा–

**गांधारी** – साम्राज्याचा साखरपुडा ! दादा,
विषाचा पुडा आहे तो मला.
साम्राज्य–वैभवानं तुम्हाला दिपवलं,
सत्तेच्या लालसेनं तुम्हाला भुलवलं.
हिऱ्यामोत्यांनी मढवलंत; म्हणून तुम्ही मला
मिरवत आणलंत, भावी वधू म्हणून
जपून-जपून, पालखीमधून,
डोळ्यातल्या बाहुलीसारखी !—
हसत असतील मनातून मला,
ते पालखीचे भोई;
त्यांना माहीत होतं, तुला माहीत होतं,
साऱ्यांना माहीत होतं;
माहीत नव्हतं फक्त मला
आंधळा आहे माझा भावी पती.
हस्तिनापूरची राणी म्हणून मी थाटात मिरवत
होते,
ते मला मनात हसत होते.
म्हणत होते, एक भिकारीण चाललीय
राणी व्हायला– आंधळ्याची राणी !
पैशाला विकलेली, सत्तेला भुललेली !
एक आंधळी भिकारीण !
किती अपमान, किती विटंबना !
मला हे त्यांनी का सांगितलं नाही ?
का लपवून ठेवलं माझ्यापासून ?
वंचनाच ही नाही तर काय ?
विश्वासघात !

नमणार नाही कधी मी या विश्वासघातापुढं.

**शकुनी** – पण भीष्मापुढं ही मान लववावीच लागेल.
गांधारी, मोडायची नसेल तर !
भीष्माशी वैर परवडणार नाही
संहार होईल गांधारकुलाचा
बांधून नेतील तुला रथाला,
राजकुमारीची दासी करून
नाही तर मरावं लागेल
अंबेसारखं रानात जळून
आणि मोडून पडेल आमचा शब्द,
आमच्या मानांबरोबर,
विच्छिन्न राजदंडासारखा
पराभवाच्या धुळीत, भीष्माच्या पायाशी.
नाही, नाही, आमचा शब्द, गांधारांचं वचन,
खडा पाषाण हिंदुकुशाचा ! अटळ !

**गांधारी** – आणि त्याच पाषाणावर
डोकं आपटून मीही मरेन शेवटी
हाय – आई ऽ–

**अलकावती** – धावा, धावा शकुनी महाराज,
धावा, सांभाळा राजकुमारीला,
कोसळली ती भोवळ येऊन –
धावा धावा

( प्रवेशांतर संगीत )

## प्रवेश तिसरा

स्थळ — पुन्हा पहिल्या प्रवेशातला हिमालयातील आश्रम.

गांधारी — त्या भोवळीनं मिटलेले डोळे
पुन्हा कधी उघडले नाहीत.
तशीच बोहल्यावर चढले, वावरले सदा
आंधळी म्हणून तुमच्या भोवती, तुमच्याबरोबर,
पट्टी बांधून, आचरलं मी
आंधळ्याचं व्रत, आपल्या पतीचं
नाकारलं मी सारं जग आणि जीवन,
जे नाकारिलं होतं—
माझ्या पतीला, परमेश्वरानं,
पण खरं सांगा मी तुमचा
काय अपराध केला होता ?
का ही कठोर शिक्षा मला दिलीत ?

धृतराष्ट्र — मी नाही दिली तुला ही शिक्षा
सांगितलं नाही मी तुला डोळे बांधायला,
असं धडपडायला, आंधळ्यासारखं;
अपेक्षा होती तू होशील माझी—
आंधळ्याची काठी, माझा सुंदर स्वप्नदीप,
पाहीन म्हटलं मी हे जग त्या प्रकाशात
तुझ्या डोळ्यांनी :
फुलं, तारे,
झुळझुळते झरे, रंग मावळतीचे, उगवतीचे,
चेहरे मुलांचे, ध्वज विजयाचे, साम्राज्य पृथ्वीचं,
सौख्य स्वर्गाचं—
पण छे !

तूही काही कमी शिक्षा केली नाहीस मला.
तू आपलं दुःख बोलून दाखवलंस,
सांगता येत नाही मला आपली वेदना
तुझ्याही जवळ–
तुझ्या मीलनाची ती पहिली रात्र !–

(प्रवेशांतर संगीत)

**विदुर** – ती पहिली रात्र, संपून संपत नाही,
ती पहिली, रात्र ! –डोळ्यांच्या काठाची,
यमुनेच्या डोहाची, चांदण्यातल्या रासाची,
त्वचेच्या रानात हरवल्या गाईंची,
ती पहिली रात्र– संपून संपत नाही,
पण धृतराष्ट्रा,
तू तर चक्क उठून बसला आहेस
त्या पहिल्या रात्री, एवढ्या सकाळी,
महालाबाहेर
धुक्यात हरवलेल्या कदंबवृक्षासारखा विरक्त,
ज्यावर टांगली होती गोपींची वसनं–
रासाच्या रात्री–

**धृतराष्ट्र** – गोपींची वसनं, कदंबवृक्षावर !
होय, विदुरा, तसाच उभा होतो मी
केवळ मिरवीत रेशमी वस्त्रं रात्रभर अंगावर !
एकही पान शहारत नव्हतं
उष्ण रक्त उसळत नव्हतं,
डहाळ्या-डहाळ्यांतून फुलं फुलविणारं !
साऱ्या रात्रींच्या चिंध्या चिंध्या झाल्या–

**अलकावती**–असं काय म्हणता महाराज ?
मीच आणलं राजकुमारीला

हात धरून, हळुवारपणानं शय्यागृहाच्या एकान्तात

धृतराष्ट्र – एकांतात ! एकांत कसला ?
एकांत नसतो आम्हा आंधळ्यांना
उघड्यावर चालतं त्यांचं सारं जीवन
कुणाच्या तरी नजरेच्या पाहाऱ्यात
एकट्याचा, केवळ आपला म्हणता येईल असा,
एकही क्षण नसतो त्यांना.
उघड्यावरच फुलं फुलतात,
पण त्यांचा उमलण्याचा क्षण
कुणी पाहिला आहे का ?
नाही, उमलण्याचा तो गूढ नाजूक क्षण
कुणीच पाहिला नसतो
जगाच्या भेदक नजरेतून निसटला असतो,
वाचला असतो, गूढ अज्ञातच राहतो,
उमलण्याचा तो सर्जनशील क्षण !
पण आम्ही आंधळे—
आमचं सर्वच उघडं नागडं—

विदुर – असं वैतागू नकोस, रागावू नकोस धृतराष्ट्रा,
काय घडलं ते तर सांगशील ?

अलकावती–काय घडायचंय महाराज ( हसत )
घडणारंच घडलं असेल

विदुर – गांधारच्या दासीनं, इथं,
कौरवांची मर्यादा सांभाळली पाहिजे, अलकावती.

अलकावती–क्षमा असावी महाराज, मी म्हणत होते
राजकुमारीला मीच पोचवलं शय्यागृहात.
मंचकावरून उतरताना मात्र त्या पडल्या.
पण जाऊ दे ते – मी सांगत होते
शय्याही मीच सजविली होती

रात्र कशी जांभया देत होती ! निळ्या आकाशी रेशमी पडद्यातून.
शय्येवर नाजूक फुलांची जाळी
त्यांच्या रंगांची भुलावण
त्यांचं सुगंधी आमंत्रण
नेत्रांना सुखद् जडता आणीत होतं,
गात्रांत एक वादळ निर्माण करीत होतं
रक्तात वीज जागवीत होतं– वीज !
ती वीज अधीर झाली होती.
बेभान मेघाच्या मिठीत चमकायला, चिरडायला–

**धृतराष्ट्र** – बरोबर बोललीस अलकावती.
ती वीज चिरडलीच गेली
आणि मागे उरली एक जखम, एक जाळ—

**विदुर** – असा कोड्यात बोलू नकोस कुरुराजा,
काय झालं ते सरळ सांग
जखम बुजवून टाकू, जाळ विझवून टाकू
गांधार आधीच रागावले आहेत, दुरावले आहेत.
तुझी रुष्टता कळाली तर,
त्यांना अधिक दुःख होईल
वंचनेच्या व्रणावर अपमानाचं मीठ चोळलं जाईल.

**धृतराष्ट्र** – विदुरा, त्याची काळजी नको
हे दुःख मी आपल्याजवळच ठेवणार आहे.
पण एवढं मात्र खरं विदुरा,
काही जखमा बुजत नाहीत,
विझत नाहीत काही जाळ—
होय जाळ ! – सद्गुणांनी पाजळलेले,
प्रतिज्ञेनं पेटवलेले
त्यागानं, निःस्वार्थीपणानं शिलगावलेले !

ही गांधारी, त्या दिवशी– ही गांधारी
डोळे बांधून बोहल्यावर चढली
मला त्याचं काही वाटलं नाही,
वाटलं जाईल हा वेडा हट्टीपणा
पण काल, पहिल्या रात्री
ती पुन्हा डोळे बांधूनच आली
शय्यागारात–
जिथे अंधाराला नक्षत्राचे नेत्र फुटतात,
सुलोचना होतात आंधळ्या वासना !
विश्वाचं सारं रहस्य ज्या गूढ गडद रात्रीत
देखणं, डोळस होतं,
तिथे ही डोळे बांधून आली !
मला वाटलं होतं, तिनं हसत हसत यावं,
ओठांनी, डोळ्यांनी, अगदी सर्वांगांनी
तिनं हसत यावं
आणि मी तिचे हसरे ओठ ओठांनी मिटावे,
तिनं हसत आपले डोळे झाकून घ्यावे
चुंबनावेगानं;
आणि अशा क्षणी स्त्री आपले डोळे का मिटते
याचं रहस्य तिनं नंतर सांगावं
मला आंधळ्याला, आपले सुंदर डोळे मिचकावीत.
मला ते डोळे दिसले नसते
पण त्यावरून मी आपली बोटं फिरवली असती,
स्पर्शानं भोगिली असती,
ती सुंदर उघडझाप
त्या श्रांत, तृप्त डोळ्यांची, मीलनाच्या रहस्याची !
नवसंभवांच्या क्षणाची

विदुर – पण कौरवेश्वरा,

असं रागावून कसं चालेल?
समजावून घ्यायला हवंस तिला तू,
अरे, ती व्रतबद्ध होती
तुला वर्ज्य ते तिलाही वर्ज्य होतं,
आंधळ्यानंच वावरायचं, ठरवलं,
दान दिलं तिनं आपल्या डोळ्याचं, दृष्टीचं,
तुझ्या प्रेमासाठी.

धृतराष्ट्र – माझ्या प्रेमासाठी ! नाही विदुरा,
आपल्या मोठेपणासाठी !
त्यागाच्या बडिवारासाठी
पातिव्रत्याच्या प्रदर्शनासाठी,
तिनं माझ्या भावनेचा चुराडा केला
मी जन्मांध होतो,
सवय होती मला आंधळेपणानं वावरायची
तिच्या शरीराला तशी सवय नव्हती,
सतीपणाच्या अट्टाहासात ती रंगमहाली आली
आणि धसमुसळेपणानं–
निसटला पूर्तीचा, तृप्तीचा
तो क्षण–

अलकावती – पण महाराज क्षमा करा मला,
तुम्ही तिला सांगितलं का? मोकळेपणानं,
आपल्या भावना बोलून दाखवल्या का?
तुम्ही तिला सांगायचं होतं, विनवायचं होतं–
मानला असता तिनं तुमचा शब्द.

धृतराष्ट्र – दासी, बोललीस पुन्हा तू,
कैवार घेऊन धनिणीचा
का विनवायचं होतं मी तिला?
तिला माझं हृदय कळत नव्हतं? –

तो व्रतभंगही सुंदर असेल नाही ?

**धृतराष्ट्र** – सुंदर, असुंदर, प्रतिज्ञा, व्रतभंग !
कशालाच काही अर्थ उरला नाही
व्रतभंगही सुंदर ठरला असता गांधारी,
पण तो क्षण आता फार दूर गेला आहे.
आता उरले आहेत हिरवे सुस्कारे,
केवळ देवदारांचे !

**गांधारी** – देवदारांचे सुस्कारे, तीक्ष्ण टोकदार, हिरवे
हिरवेगार !
ते ऐकूनच मीही सुस्कारा टाकला. नकळत,
माहेरची आठवण झाली असावी मला

**धृतराष्ट्र** – म्हणजे ! गांधारी, तू अजून पोळतेस
माहेरच्या आठवणींनी ?

**गांधारी** – नाही, स्वामी, मुळीच नाही,
पुन्हा चुकलात आपण
माझी स्मृती चाळवली या हिरव्या सूचिपत्रांनी
उठली बारीक कळ, आठवण झाली मला
ती माहेरच्या माणसांची नव्हे,
गांधारच्या प्रदेशाची, माझ्या जन्मभूमीची
लाजाहोमाची ज्वाला
फुलवली मी फुंकरीनं, त्या क्षणीच
जाळून टाकली, त्या लाह्यांबरोबरच, माझ्या
माहेरची आठवण,
भावाशीही कधी बोलले नाही
महालातल्या महालात राहून,
पण अक्रोडाचे ते विशाल वृक्ष,
त्यांच्या घनदाट छाया, तुरट-हिरवे-कच्चे बदाम,
पानजाळीतून झळकणारे लाल केशरी दिवे,

पक्क्या सफरचंदांचे
अजूनही मला बोलावतात, साद घालतात
या भग्न एकाकी जिवाला,
शंभर मुलांच्या मृत्यूचे स्मशान झालेल्या
या उद्ध्वस्त हृदयाला !

**धृतराष्ट्र** – बरंच दिसतं की या माझ्या ' पट्टीच्या ' आंधळीला
अक्रोडांच्या छाया,
फळांचे रंग, सफरचंदांच्या ज्योती !–

**गांधारी** – दिसत नाहीत, ऐकू येतात स्वामी,
ऐकू येतात रंगाचे नाद, प्रकाशाचे ध्वनी–
सारी सुखं, सारी, स्वप्नं रचीत आले मी,
शब्दांच्या रेघांनी ध्वनींच्या रूपांनी :
शंभर पुत्रांना जन्म दिला मी
पण त्यांना मी पाहिलं नाही, फक्त ऐकिलं.
त्यांचं हसणं, त्यांचं रडणं,
त्यांचे जयनाद, त्यांचे आनंद-कल्लोळ,
त्यांचं आक्रंदन, आणि शेवटी–
त्यांच्या मरणाच्या किंकाळ्या– शंभर किंकाळ्या !
एक नव्हे, दोन नव्हे, शंभर किंकाळ्या ! –

**धृतराष्ट्र** – शांत हो, गांधारी, शांत हो,
थोडा विचार कर, ही विपत्ती, ही दुःखं
तुझी तूच ओढवून घेतली नाहीस का ?
ह्या तुझ्या आंधळेपणाप्रमाणे—

**गांधारी** – नाही, नाही, महाराज, हे आंधळेपण –
मी माझ्यावर ओढवून घेतलं नाही,
लादण्यात आलं ते माझ्यावर.

**धृतराष्ट्र** – लादण्यात आलं ? कुणी लादलं ?

**गांधारी** – तुम्ही ! तुम्ही लादलंत ते माझ्यावर.

धृतराष्ट्र – मी? मी लादलं?

गांधारी – हो, तुम्हीच लादलंत,
फसवलंत तुम्ही मला;
असह्य फसवणूक. अघोर वंचना,
साऱ्या दिशा झाकोळल्या
दिवे विझले, फुले मिटली, मिटले माझेही डोळे
गच्च–गच्च !–भयानं
विस्मयानं, भविष्याच्या भयाण जाणिवेनं.
फुलांचं हसणं बघवलं नाही
डोहातलं चांदणं पाहवलं नाही;
त्या फुलांत साप फुंफाटत होता,
विषदंत शिवशिवत होता ! चांदण्यात
का केलात माझा असा विश्वासघात?

धृतराष्ट्र – विश्वासघात !––
मी केला नाही, मी केला नाही गांधारी,
मीच शोधीत होतो विश्वास
कुणाच्या शब्दांत, कुणाच्या स्पर्शात–

गांधारी – शब्द, स्पर्श ! महाराज,
सारंच खोटं, सारंच फसवं.
शब्द कानाशी संपतो
स्पर्श त्वचेशी थांबतो
पुढे हृदयात सारा अंधार, निःशब्द निर्जन अंधार !
अजून, अजून, आठवते ती दुपार
हस्तिनापुरीची, पिवळ्या केतकीची
धुंद, सुस्त, आळसावलेली उन्हं
फांद्याफांद्यातून लोंबत होती,
मोत्यांच्या मुंडावळ्यांसारखी !
तटाशी यमुना पेंगत होती

गोपुरं डुलकी घेत होती
नदीच्या गळ्यात गळा घालून
सारं शांत, निस्तब्ध, तरीही हुरहूर लावणारं:
ऊन सावल्यांचं संगमर्मरी फूल !
तडा गेला त्या संगमर्मराला,
भूकंपाची लहरच सरसरत गेली पायांखालून
सारी तनू थरथरली भीतीबरोबर,
पायऱ्यांवरून दासी धावत आली, ओरडली
' घात झाला, पोरी, घात झाला ! '

( प्रवेशांतर संगीत )

## प्रवेश दुसरा

स्थळ—हस्तिनापुरीतला महाल.

**अलकावती**—घात झाला, पोरी घात झाला
हस्तिनापूरचा थोरला राजकुमार
तुझा भावी पती जन्मांध निघाला,
राजकुमारी, बेटी, पुरा घात झाला.

**गांधारी** (तरुणपणातली) — काय म्हणतेस? म्हणतेस काय
अलकावती?
असं कसं होईल?—फसवतील
असं?—
कोण?—कशासाठी? नाही,
अलकावती, तुझीच काही तरी भूल
आहे.

काय ऐकलंस?–कोण बोललं?–
पण नाही! नाही, असं होणार नाही!

**अलकावती** – पण असं झालं आहे, राजकुमारी.

**गांधारी** – नाही ग खरं वाटत नाही, अलकावती,
विश्वास बसत नाही माझा या कानांवर.

**अलकावती** – राजकुमारी, पोरी, माझ्या लाडक्या बाळे,
आता कानांवरच विश्वास ठेवावा लागेल.
डोळ्यांनी फसवलं आहे.
अंधाचीच होशील सहधर्मचारिणी तू
खरं आहे, लाडक्या बाळे, खरं आहे हे–
आपली वंचना झाली आहे–
वंचनेचाच साखरपुडा होता तो!
कौरवांचा राजकुमार जन्मांध आहे
खरं आहे गांधारी, मी खरं तेच सांगते आहे–
तू दुर्दैवी आहेस, अन्
कौरवांचा राजकुमार तुझा वाग्दत्त पती
जन्मांध आहे.

**गांधारी** – जन्मांध आहे! जन्मांध आहे तो?
माझा भावी पती, जन्माचा सोबती,
कौरवांचा भावी सम्राट!-खरं आहे हे?
मग त्यांनी तसं का सांगितलं?
का लपवून ठेवलं?
का केली अशी माझी भयंकर फसवणूक?
खरं का सांगितलं नाही?

**अलकावती**–आता का सांगितलं नाही?–
कोण सांगतो बाळे, आपलं व्यंग?
पुन्हा ते राजाचं व्यंग!
यालाच राजकारण म्हणतात पोरी!

राजकारणानं बळी घेतला ग तुझा !
बळी घेतला

गांधारी – राजकारण? राजकारण होतं ते !
मुलीचं लग्नकार्य ! धर्मकार्य–नव्हतं ते ?
तरी पण का सांगितलं नाही–का ? अं?–
मी बाबांना विचारते, दादाला विचारते,
प्रत्यक्ष भीष्मपितामहांना विचारते,
मला का सांगितलं नाही ?

सलकावती – राजकुमारी, का ते कळणार नाही
अन् ते कुणीच सांगणार नाही.
बाळे, अजून तू लहान आहेस,
पराधीन असतो स्त्रीचा जन्म
पुरुषांनी करावं आणि आम्ही भोगावं
हेच स्त्रियांचं जीवन. पुन्हा –
कोण कशाला सांगतील ?
आम्हीच शोध घ्यायला पाहिजे होता,
ते आम्हीच आंधळे बनलो;

गांधारी – कशानं ?
त्यांच्या संपत्तीनं ? त्यांच्या वैभवानं ?
की, त्यांच्या राजविलासी मधाळ शब्दानं ?
वस्त्रांच्या भेटी ! रत्नांचे नजराणे !—
मला काय माहीत त्यांचेही डोळे
दृष्टिहीन आहेत त्या तेजाळ रत्नांसारखे !–
की, ते डोळेच मदांध आहेत, आंधळे झाले आहेत,
सत्तेच्या कैफानं, बळाच्या, पराक्रमाच्या
अहंकारानं !
नाही, त्या दृष्टिहीन रत्नांना,
मदांध डोळ्यांना, नाही – नाही—

मी अशी शरण जाणार नाही,
वाकणार नाही ह्या अंध बळापुढं
गांधारराजकन्या
जा, अलकावती, जाऊन सांग त्यांना :
मी अंधाशी लग्न करणार नाही.
होणार नाही हे लग्न.

शकुनी – ( प्रवेशून ) कोण म्हणतो हे लग्न होणार नाही
म्हणून ?
हे लग्न झालंच पाहिजे,
होऊन राहील.

गांधारी – काय दादा ? काय म्हणतोस हे शकुनीदादा ?
अरे, मी काय फासा आहे द्यूताचा ! दादा,
तुझ्या हातातला,
तुझ्या इच्छेप्रमाणे पडायला !
म्हणे हे लग्न झालंच पाहिजे !
कोण तू लग्न करणार माझं ? माझ्या मनाविरुद्ध ?
नाही, शक्य नाही ते.
मी आंधळ्याला वरणार नाही.

शकुनी – वरणार नाहीस तू आंधळ्याला ?

गांधारी – नाही. माझी इच्छा नाही.

शकुनी – गांधारी, कोण विचारतो तुझ्या इच्छेला ?
स्त्रीला स्वतःची इच्छा नसते
ती असते स्वतःच नुसती इच्छा :
एखाद्या पित्याची, एखाद्या भावाची,
किंवा अज्ञात पतीची वा अजात पुत्राची ! -
नुसती इच्छा, मुकी अजाण !
गांधारी, करावंच लागेल तुला हे लग्न
शब्द दिला आहे मी कौरवांना.

**गांधारी** – असशील दिला शब्द तू कौरवांना,
माळला असशील तू त्यांच्या वैभवाला !
भ्याला असशील तू त्यांच्या सामर्थ्याला !
पण दादा, विवाह माझा आहे, मान्य नाही
मला तो,
शरण जाणार नाही मी अशा वंचनेला
तुझ्यासारखी !

**शकुनी** – शरण ! वंचना ! व्यर्थ, निरर्थक शब्द !
स्वतःचा अर्थच नसतो ह्या शब्दांना
दुबळ्यांना जी वंचना वाटते, तो–
तो अधिकार असतो समर्थांचा.
हूं : वंचना – कसली वंचना ?

**गांधारी** – वंचनाच नाही तर काय दादा ?
तुला हे माहीत होतं साखरपुडा होण्यापूर्वी ?
खरं सांग, दादा.

**शकुनी** – हो, गांधारी, मला हे माहीत होतं.

**गांधारी** – हाय रे दुर्दैवा ! त्याला हे माहीत होतं !

**शकुनी** – गांधारी, मला हे माहीत होतं,
तू सम्राटाची राणी होणार आहेस,
हस्तिनापूरची सम्राज्ञी !
इंद्राणिनींही हेवा करावा असं वैभव
अशी सत्ता – तुला मिळणार आहे,
हे मला माहीत होतं –
अंध असला म्हणून काय झालं ?
तुझ्याच हाती येणार आहे सारी सत्ता.
त्या आंधळ्यासह ! नाही, तसं नाही.
मला म्हणायचंय सत्ता तशी थोडी आंधळीच असते !
नाही का ? सम्राटाचा साखरपुडा !

गांधारी, मोठी भाग्यशाली आहेस तू.
साऱ्या साम्राज्याचा साखरपुडा–

**गांधारी** – साम्राज्याचा साखरपुडा ! दादा,
विषाचा पुडा आहे तो मला.
साम्राज्य–वैभवानं तुम्हाला दिपवलं,
सत्तेच्या लालसेनं तुम्हाला भुलवलं.
हिऱ्यामोत्यांनी मढवलंत; म्हणून तुम्ही मला
मिरवत आणलंत, भावी वधू म्हणून
जपून-जपून, पालखीमधून,
डोळ्यातल्या बाहुलीसारखी !—
हसत असतील मनातून मला,
ते पालखीचे भोई;
त्यांना माहीत होतं, तुला माहीत होतं,
साऱ्यांना माहीत होतं;
माहीत नव्हतं फक्त मला
आंधळा आहे माझा भावी पती.
हस्तिनापूरची राणी म्हणून मी थाटात मिरवत
होते,
ते मला मनात हसत होते.
म्हणत होते, एक भिकारीण चाललीय
राणी व्हायला– आंधळ्याची राणी !
पैशाला विकलेली, सत्तेला भुललेली !
एक आंधळी भिकारीण !
किती अपमान, किती विटंबना !
मला हे त्यांनी का सांगितलं नाही ?
का लपवून ठेवलं माझ्यापासून ?
वंचनाच ही नाही तर काय ?
विश्वासघात !

नमणार नाही कधी मी या विश्वासघातापुढं.

शकुनी — पण भीष्मापुढं ही मान लववावीच लागेल.
गांधारी, मोडायची नसेल तर !
भीष्माशी वैर परवडणार नाही
संहार होईल गांधारकुलाचा
बांधून नेतील तुला रथाला,
राजकुमारीची दासी करून
नाही तर मरावं लागेल
अंबेसारखं रानात जळून
आणि मोडून पडेल आमचा शब्द,
आमच्या मानांबरोबर,
विच्छिन्न राजदंडासारखा
पराभवाच्या धुळीत, भीष्माच्या पायाशी.
नाही, नाही, आमचा शब्द, गांधारांचं वचन,
खडा पाषाण हिंदुकुशाचा ! अटळ !

गांधारी — आणि त्याच पाषाणावर
डोकं आपटून मीही मरेन शेवटी
हाय – आई ऽ–

अलकावती – धावा, धावा शकुनी महाराज,
धावा, सांभाळा राजकुमारीला,
कोसळली ती भोवळ येऊन –
धावा धावा

( प्रवेशांतर संगीत )

## प्रवेश तिसरा

स्थळ — पुन्हा पहिल्या प्रवेशातला हिमालयातील आश्रम.

गांधारी — त्या भोवळीनं मिटलेले डोळे
पुन्हा कधी उघडले नाहीत.
तशीच बोहल्यावर चढले, वावरले सदा
आंधळी म्हणून तुमच्या भोवती, तुमच्याबरोबर,
पट्टी बांधून, आचरलं मी
आंधळ्याचं व्रत, आपल्या पतीचं
नाकारलं मी सारं जग आणि जीवन,
जे नाकारिलं होतं—
माझ्या पतीला, परमेश्वरानं,
पण खरं सांगा मी तुमचा
काय अपराध केला होता ?
का ही कठोर शिक्षा मला दिलीत ?

धृतराष्ट्र — मी नाही दिली तुला ही शिक्षा
सांगितलं नाही मी तुला डोळे बांधायला,
असं धडपडायला, आंधळ्यासारखं;
अपेक्षा होती तू होशील माझी—
आंधळ्याची काठी, माझा सुंदर स्वप्नदीप,
पाहीन म्हटलं मी हे जग त्या प्रकाशात
तुझ्या डोळ्यांनी :
फुलं, तारे,
झुळझुळते झरे, रंग मावळतीचे, उगवतीचे,
चेहरे मुलांचे, ध्वज विजयाचे, साम्राज्य पृथ्वीचं,
सौख्य स्वर्गाचं—
पण छे !

तूही काही कमी शिक्षा केली नाहीस मला.
तू आपलं दुःख बोलून दाखवलंस,
सांगता येत नाही मला आपली वेदना
तुझ्याही जवळ–
तुझ्या मीलनाची ती पहिली रात्र !–

( प्रवेशांतर संगीत )

**विदुर** – ती पहिली रात्र, संपून संपत नाही,
ती पहिली, रात्र ! –डोळ्यांच्या काठाची,
यमुनेच्या डोहाची, चांदण्यातल्या रासाची,
त्वचेच्या रानात हरवल्या गाईंची,
ती पहिली रात्र– संपून संपत नाही,
पण धृतराष्ट्रा,
तू तर चक्क उठून बसला आहेस
त्या पहिल्या रात्री, एवढ्या सकाळी,
महालाबाहेर
धुक्यात हरवलेल्या कदंबवृक्षासारखा विरक्त,
ज्यावर टांगली होती गोपींची वसनं–
रासाच्या रात्री–

**धृतराष्ट्र** – गोपींची वसनं, कदंबवृक्षावर !
होय, विदुरा, तसाच उभा होतो मी
केवळ मिरवीत रेशमी वस्त्रं रात्रभर अंगावर !
एकही पान शहारत नव्हतं
उष्ण रक्त उसळत नव्हतं,
डहाळ्या-डहाळ्यांतून फुलं फुलविणारं !
साऱ्या रात्रींच्या चिंध्या चिंध्या झाल्या–

**भल्कावती**–असं काय म्हणता महाराज ?
मीच आणलं राजकुमारीला

हात धरून, हळुवारपणानं शय्यागृहाच्या एकान्तात
**धृतराष्ट्र** – एकांतात ! एकांत कसला ?
एकांत नसतो आम्हा आंधळ्यांना
उघड्यावर चालतं त्यांचं सारं जीवन
कुणाच्या तरी नजरेच्या पाहाऱ्यात
एकट्याचा, केवळ आपला म्हणता येईल असा,
एकही क्षण नसतो त्यांना.
उघड्यावरच फुलं फुलतात,
पण त्यांचा उमलण्याचा क्षण
कुणी पाहिला आहे का ?
नाही, उमलण्याचा तो गूढ नाजूक क्षण
कुणीच पाहिला नसतो
जगाच्या भेदक नजरेतून निसटला असतो,
वाचला असतो, गूढ अज्ञातच राहतो,
उमलण्याचा तो सर्जनशील क्षण !
पण आम्ही आंधळे—
आमचं सर्वच उघडं नागडं—
**विदुर** – असं वैतागू नकोस, रागावू नकोस धृतराष्ट्रा,
काय घडलं ते तर सांगशील ?
**अलकावती**—काय घडायचंय महाराज ( हसत )
घडणारंच घडलं असेल
**विदुर** – गांधारच्या दासीनं, इथं,
कौरवांची मर्यादा सांभाळली पाहिजे, अलकावती.
**अलकावती**—क्षमा असावी महाराज, मी म्हणत होते
राजकुमारीला मीच पोचवलं शय्यागृहात.
मंचकावरून उतरताना मात्र त्या पडल्या.
पण जाऊ दे ते – मी सांगत होते
शय्याही मीच सजविली होती

रात्र कशी जांभया देत होती ! निळ्या आकाशी रेशमी
पडद्यातून.
शय्येवर नाजूक फुलांची जाळी
त्यांच्या रंगांची भुलावण
त्यांचं सुगंधी आमंत्रण
नेत्रांना सुखद जडता आणीत होतं,
गात्रांत एक वादळ निर्माण करीत होतं
रक्तात वीज जागवीत होतं– वीज !
ती वीज अधीर झाली होती.
बेभान मेघाच्या मिठीत चमकायला, चिरडायला–

**धृतराष्ट्र** – बरोबर बोललीस अलकावती.
ती वीज चिरडलीच गेली
आणि मागे उरली एक जखम, एक जाळ—

**विदुर** – असा कोड्यात बोलू नकोस कुरुराजा,
काय झालं ते सरळ सांग
जखम बुजवून टाकू, जाळ विझवून टाकू
गांधार आधीच रागावले आहेत, दुरावले आहेत.
तुझी रुष्टता कळाली तर,
त्यांना अधिक दुःख होईल
वंचनेच्या व्रणावर अपमानाचं मीठ चोळलं जाईल.

**धृतराष्ट्र** – विदुरा, त्याची काळजी नको
हे दुःख मी आपल्याजवळच ठेवणार आहे.
पण एवढं मात्र खरं विदुरा,
काही जखमा बुजत नाहीत,
विझत नाहीत काही जाळ—
होय जाळ ! – सद्गुणांनी पाजळलेले,
प्रतिज्ञेनं पेटवलेले
त्यागानं, निःस्वार्थीपणानं शिलगावलेले !

ही गांधारी, त्या दिवशी– ही गांधारी
डोळे बांधून बोहल्यावर चढली
मला त्याचं काही वाटलं नाही,
वाटलं जाईल हा वेडा हट्टीपणा
पण काल, पहिल्या रात्री
ती पुन्हा डोळे बांधूनच आली
शय्यागारात–
जिथे अंधाराला नक्षत्राचे नेत्र फुटतात,
सुलोचना होतात आंधळ्या वासना !
विश्वाचं सारं रहस्य ज्या गूढ गडद रात्रीत
देखणं, डोळस होतं,
तिथे ही डोळे बांधून आली !
मला वाटलं होतं, तिनं हसत हसत यावं,
ओठांनी, डोळ्यांनी, अगदी सर्वांगांनी
तिनं हसत यावं
आणि मी तिचे हसरे ओठ ओठांनी मिटावे,
तिनं हसत आपले डोळे झाकून घ्यावे
चुंबनावेगानं;
आणि अशा क्षणी स्त्री आपले डोळे का मिटते
याचं रहस्य तिनं नंतर सांगावं
मला आंधळ्याला, आपले सुंदर डोळे मिचकावीत.
मला ते डोळे दिसले नसते
पण त्यावरून मी आपली बोटं फिरवली असती,
स्पर्शानं भोगिली असती,
ती सुंदर उघडझाप
त्या श्रांत, तृप्त डोळ्यांची, मीलनाच्या रहस्याची !
नवसंभवांच्या क्षणाची
विदुर – पण कौरवेश्वरा,

असं रागावून कसं चालेल ?
समजावून घ्यायला हवंस तिला तू,
अरे, ती व्रतबद्ध होती
तुला वर्ज्य ते तिलाही वर्ज्य होतं,
आंधळ्यानंच वावरायचं, ठरवलं,
दान दिलं तिनं आपल्या डोळ्याचं, दृष्टीचं,
तुझ्या प्रेमासाठी.

धृतराष्ट्र — माझ्या प्रेमासाठी ! नाही विदुरा,
आपल्या मोठेपणासाठी !
त्यागाच्या बडिवारासाठी
पातिव्रत्याच्या प्रदर्शनासाठी,
तिनं माझ्या भावनेचा चुराडा केला
मी जन्मांध होतो,
सवय होती मला आंधळेपणानं वावरायची
तिच्या शरीराला तशी सवय नव्हती,
सतीपणाच्या अट्टाहासात ती रंगमहाली आली
आणि धसमुसळेपणानं—
निसटला पूर्तीचा, तृप्तीचा
तो क्षण—

अलकावती — पण महाराज क्षमा करा मला,
तुम्ही तिला सांगितलं का ? मोकळेपणानं,
आपल्या भावना बोलून दाखवल्या का ?
तुम्ही तिला सांगायचं होतं, विनवायचं होतं—
मानला असता तिनं तुमचा शब्द.

धृतराष्ट्र — दासी, बोललीस पुन्हा तू,
कैवार घेऊन धनिणीचा
का विनवायचं होतं मी तिला ?
तिला माझं हृदय कळत नव्हतं ? —

आणि ती माझा शब्द मानणार !
सतीपणाचा कैफ चढला होता ना तिला–
सतीपणाचा तोरा आड आला तिचा

विदुर – पण कौरवेश्वरा, तुझं राजेपण ! ते कुठं गेलं होतं ?
तू राजा होतास, आपल्या राजधानीत होतास,
आणि ती तुझी प्रजा होती,
आज्ञा करायची होतीस,
ओरबाडून काढायची होतीस ती पट्टी–

धृतराष्ट्र – विदुरा,
मला अधिकार वापरायचा नव्हता
बळाचा उपयोग करायचा नव्हता
तिनं आपणहून ते करायला हवं होतं.
माझं मन ओळखून,
माझं प्रेम पारखून. पण ती –
सतीपणाच्या अभिमानानं चेतली होती
प्रतिज्ञेच्या चुडानं पेटली होती
पातिव्रत्याच्या, नाही, – सूडाच्या
ज्वाळेनं जळत होती,
किती भयानक होती ती रात्र,
तो शृंगार, वाटलं,
वाटलं, गळा दाबून प्राण घ्यावा तिचा !

( प्रवेशान्तराचं वाद्यसंगीत )

प्रवेश चवथा

स्थळ — हस्तिनापुरातच — पन्नास वर्षांनी

गांधारी — बरं झालं असतं,
गळा दाबून ‑ाण घेतला असता त्या रात्री, तर—
बरं झालं असतं, फार बरं झालं असतं
पुढचं सारं महाभारत टळलं असतं.
हे वैर, हे युद्ध, हा संहार, हे दुःख
सारं, सारं टळलं असतं
परंतु तेव्हा यांना गळा दाबायची बुद्धी झाली नाही
अन् मलाही, विदुरा, पट्टी सोडायची बुद्धी झाली
नाही
पण आज मी पट्टी सोडणार आहे — आणि
खरं सांगू विदुरभावोजी—
आता खरं सांगायला काही हरकत नाही—
सुख दुःख सर्व वाहून गेलं
जय—पराजय सारखे झाले
तिथं आता कशाला भ्यायचं ?
विदुरभावोजी, खरं म्हणजे यांना —
यांना मनातून तसं वाटतच नव्हतं
विदुर — म्हणजे ! कसली भलतीच कल्पना
गांधारी वहिनी, तुमची—
गांधारी — खरं तेच सांगतेय्—
मी पट्टी सोडावी, असं यांच्या मनातच नव्हतं.
दुर्योधन जन्मला तेव्हाची गोष्ट :
किती तळमळत होतं माझं मन पुत्रमुख पाहायला
मांडीला त्याचा फुलाचा स्पर्श जाणवत होता

बोटांतून रेशमी जावळ भुरभुरत होतं
त्याचे अर्थहीन बोल:जिवाला सुखवीत होते
अधीर करीत होते,
हृदयाशी धरून त्याला पाजवताना
सर्वांगाचे डोळे होत होते,
अन् पंचप्राण बंद डोळ्यांतून फुटून पाहात होते;
पण यांनी कधी म्हटलं नाही,
पट्टी सोड म्हणून—
ह्यांच्या मनातच नव्हतं,
माझा मत्सर वाटत होता यांना
मुलाचं मुख मला पाहता येत नाही
याचा आनंदच होत होता यांना.

**विदुर** — गांधारी वहिनी, ही तुमची काहीतरीच कल्पना
नयनहीन असला, तरी इतका हृदयहीन नाही
हा आमचा धृतराष्ट्र.

**गांधारी** — तुम्ही म्हणा तसं. मी नाही म्हणणार.
मी सांगत्ये, यांनी माझी वंचना केली होती
तरी हे म्हणत होते
डोळे बांधून मी त्यांचा सूड घेते म्हणून
आणि हेच माझा असा सूड घेत होते—
माझ्या शब्दानं, माझ्या कृत्यानं
माझाच गळा ते आवळीत होते ! शेवटी—शेवटी—
काय झालं पट्टी सोडली नाही म्हणून ?
दु:ख पाहायचं थोडंच टळलं नशिबातलं ?

**अलकावती** — शांत हो, राजकुमारी शांत हो,
काय होणार आहे, आपल्या दैवाचा दोष
दुसऱ्याच्या कपाळी घासला म्हणून ?

**गांधारी** — शांत कशी होऊ अलकावती ?

आणि ए– तू मला राजकुमारी काय म्हणतेस ?
चांगली राणी झाले ! सम्राज्ञी झाले
हस्तिनापूरची !
आई झाले, सासू झाले. आजी–पणजीही झाले,
तरी अजूनही तू मला राजकुमारीच म्हणतेस ?–
पण मी आज राजकुमारीही नाही;
एक पराभूत स्त्री आहे मी– एक पराभूत स्त्री !
माझी नव्याण्णव मुलं मेली आजपर्यंत
एकाचंही तोंड मला पाहता आलं नाही
येणारा प्रत्येक दिवस,
माझ्या हृदयाचा लचका तोडूनच उगवतो
प्रत्येक पहाटेला मी घाबरून विचारते
'किती उरले आज ?' किती उरले ?–'

विदूर – पण महाराणी, हा तुमचाच दोष नाही का ?
तुमच्या पापाचंच फळ नाही का ?
पांडवांशी युद्ध करू नका,
त्यांचा न्याय्य वाटा देऊन टाका त्यांना,
त्यांच्यावर अन्याय करू नका,
परोपरीनं सांगितलं, पण तुम्हांला पटलं नाही
खोट्या कपटी द्यूताला तुमची संमती होती,
पांडवांच्या वनवासाचे तुम्ही मूक साक्षीदार होता,
भरसभेत द्रौपदीची विटंबना झाली,
प्रत्यक्ष तुझ्या सुनेला विवस्त्र करण्याचा
घाट घातला तुझ्या पुत्रांनी
तरीही तुझं हृदय हललं नाही,
तुझ्या डोळ्यांवरची पट्टी
किंचितही ढळली नाही, गांधारी–

गांधारी – ढळून तरी काय उपयोग होता विदुरभावोजी ?

आमच्या मुलांचे अपराध
दिसत का नव्हते आम्हाला ?
पण आम्ही त्यांचे मातापिता होतो,
न्यायाधीश नव्हतो.
त्यांना विरोध करणं,
पापापासून विनाशापासून त्यांना वाचवणं,
शक्य नव्हतं आम्हाला
त्यांच्याबरोबर चिरडून नष्ट होणंच
फक्त आमच्या हाती होतं
त्या सर्वनाशाच्या क्षणाचीच
प्रतीक्षा करीत आहे मी आज.

**विदुर** – डोळे बांधून ?

**गांधारी** – हो, डोळे बांधून.
एवढा मोठा विनाश पाहायची, आज
शक्ती नाही या उघड्या डोळ्यांत !

**विदुर** – असं होतं तर, मग गांधारी,–
मघाशी कशाला दोष दिलास धृतराष्ट्राला ?

**गांधारी** – दोष नाही देत विदुर भावोजी, आता
त्यांची इच्छा म्हणून मी पट्टी सोडणार नाही
मी आज पट्टी सोडणार आहे, ती
त्यांची अवज्ञा करण्यासाठीच
माझ्या मुलाला डोळे भरून पाहणार आहे मी
माझा मुलगा– माझा पहिला– ( हुंदका )
आणि तोच आता शेवटला, एक– उरलेला मुलगा,
इतक्यात इथं येणार आहे
त्याला पहिल्यांदा आणि शेवटचा मी बघणार आहे,
त्यांना न विचारता, आपल्या मनानं.

**विदुर** – काय दुर्योधन इथं येणार आहे ?

युद्धभूमीवरून ?
गांधारी – होय, त्यानं कृपाला अभिषेक केला आहे
सेनापतीपदाचा
आणि आता तो इथं येणार आहे
माझा सुयोधन इथं येणार आहे
माझ्या भुक्या डोळ्यांचं पारणं फेडणार आहे
तो जन्मला तेव्हा फार पाहावंसं वाटलं होतं त्याला,
पण माझ्याच शपथेत मी गुंतले होते;
आशाळभूतपणे वाट पाहात होते
यांच्या एका शब्दाची
पण तो एक शब्द यांनी नाही उच्चारला,
नाही उच्चारला !–
मीही माझ्या इच्छा
मनातच चिणून टाकल्या !
पण आज ते व्रत मी मोडणार आहे
माझ्या बाळाला एकदा पाहणार आहे
बोलावलं आहे इथं मी त्याला
ये, बाळा सुयोधना ये, किती उशीर हा !
तुझ्या आईच्या म्हाताऱ्या डोळ्यांत
आता फार त्राण उरला नाही रे–
दुर्योधन – (प्रवेशून) हा आलो मी आई, इकडे पाहा,
तुझा सुयोधन तुझ्यासमोर उभा आहे.
अलकावती–अग बाई, खरंच दुर्योधनमहाराज,
पण असे कसे? सारी राजवस्त्रं काय केली ?
दुर्योधन – मी दुर्योधन वंदन करतो विदुरतातांना.
विदुर – सुयोधना, वत्सा तुझा विजय असो !
दुर्योधन – माझा अजून पराभव झालेला नाही, तात !
विदुर – पण हे काय सुयोधना, का त्याग केलास असा

राजचिन्हांचा, तुझ्या राजवस्त्रांचा !

**दुर्योधन** – आई, तुला वंदन करतो आहे.
तुझा सुयोधन.

**गांधारी** – कुठं, कुठं, आहे माझा सुयोधन? माझा बाळ?
बाळा, ही पाहा मी पट्टी सोडली.
ये बाळा, माझ्याजवळ ये असा
तुझ्या अंगावरून हात फिरवू दे मला
कुरवाळू दे, हुंगू दे तुझं मस्तक
बाळा, मला स्पष्ट दिसत नाही रे,
जवळ ये ना जरा,
माझ्या डोळ्यांना आजच जन्मलास तू
जन्मतः जसा होतास,
तसाच तुला पाहायचा आहे मला, तसाच,
अगदी तसाच.

**दुर्योधन** – हा मी इथं उभा आहे आई
तू सांगितलं तसाच आलो आहे,
अगदी जन्मलो तसा !

**गांधारी** – विजयी हो बाळा, ये, जवळ ये,
डोळे भरून पाहू दे तुला
निवू दे तहान माझ्या डोळ्यांची,
या तान्हेल्या, भुकेल्या डोळ्यांचं सारं पुण्य,
माझ्या व्रताचं सारं फळ मी तुला देणार आहे.
वज्रदेही करणार आहे तुला एका दृष्टिक्षेपात !

**दुर्योधन** – म्हणूनच मी असा आलो आहे–
सांगितलं तसा, अगदी जन्मलो तसा आई.
माझ्या या धृष्टतेबद्दल
मला क्षमा करा, तात.
मरणही कसं निर्लज्ज बनवितं तात, माणसाला !

छे, नको होता तात,
असा मित्रेपणा करायला मी;
विजयातही टोचत राहतील काटे होऊन
ही फुलं !

**गांधारी** – (पट्टी सोडून पाहात) ही फुलं ! खरंच; हे काय
सुयोधना ?
कुणी दिलं हे फुलांचं कटिवस्त्र ?
घात झाला बाळा, घात झाला !
कुणी दिली ही बुद्धी तुला ?

**दुर्योधन** – श्रीकृष्णानं, आई. त्यानंच दिलं हे फुलांचं कटिवस्त्र
म्हणाला, आई झाली म्हणून काय झालं ?
तिच्याकडं असं अगदी नग्न जायचं ?–
मला पसंत पडलं त्याचं म्हणणं
हे तात इथं असतील याची कल्पना नव्हती मला.

**विदुर** – त्याची खंत करू नको सुयोधना,
पण मला तुझी दया येते.
फुलांनीच इंदुमतीचं मरण ओढवलं,
अन् तीच फुलं आडवी आली आज विजयाच्या मार्गात
तुझ्या आणि गांधारीच्या !

**गांधारी** – वत्सा, सारा घात झाला.
नियतीलाही तेच पसंत आहेसं दिसतं.
माझी मात्र जन्मभराची तपश्चर्या व्यर्थ गेली–
फुकट गेलं सतीचं पुण्य.
मीच चुकले, नको होतं मलाच– व्रत मोडायला
पट्टी बांधली काय अन् सोडली काय
होणारं टळत नाही.
जा, जा आता माझ्या समोरून,
क्षणभरही इथं उभा राहू नकोस

तो फुलांचा मांड्यांचा भाग सोडून,
सर्व शरीरानं वज्रदेही झाला आहेस तू,
पण त्या मांड्यांवरच भीमाची गदा बसेल
आणि पूर्ण होईल नियतीची इच्छा,
संपूर्ण क्षय होईल कौरव कुळाचा.
उगीच, उगीच पाहिलं तुला
कृष्णानं मात्र आपला डाव साधला
पूर्ण कुलक्षय केला त्यानं कौरवांचा
पण त्याचंही कुल असंच नष्ट होईल,
आपल्यांतच लढून मरतील सारे यादव
दर्भाच्या पात्यानं. जा तू आता.
नियती कठोर आहे, अटळ आहे
हे श्रीकृष्णालाही कळून येईल.
मी मस्तक नमवलं आहे तिच्या संहारचक्रासमोर !
शत शतकांचा, युगायुगांचा चुराडा करणारं ते
विराटचक्र
माझ्याही मस्तकावरून गडगडत निघून जाईल.
पट्टी बांधली आहे पुन्हा मी—
तरी तो रथ मला दिसतो आहे
झगमगत, धडधडत येतो आहे
कर्ण—द्रोणांच्या शवांवरून
माझ्या शंभर पुत्रांच्या प्रेतांवरून !
कसं थांबवणार त्याला
माझे दुबळे आंधळे हात ?
कसं थांबवणार मी त्याला ? कसं ?
सुयोधना, जा तू आता,
त्या चक्राखाली चिरडलं जाणारं तुझं मस्तक
मला पाहवत नाही. जा, तू जा आता.

दुर्योधन — आई, तू चिंता करू नकोस
अमर नसलो, तरी मी अजिंक्य आहे
माझ्या मुखावरील अभिमानाचं स्मित
कुणीच हिरावून घेऊ शकणार नाही.
जातो मी.

विदुर — गांधारी वहिनी, शोक आवरा जरा
काहीच अगोचर नाही तुमच्या दृष्टीला

अलकावती — धीर धर, दुर्दैवी राजकुमारी.
तूच आपणहून आंधळ्या नियतीला वरलं आहेस.

गांधारी — शोक आवरला, सारेच आवरलं आहे
आता विदुरा,
शोक तरी कशाचा करायचा ?
सगळं संपलं आहे, सगळं शांत आहे
आता शांतच व्हायला पाहिजे, राहायला पाहिजे
माझे पुत्र होते, जेव्हा त्यांच्या दुःखानं
हे हृदय फुटत होतं, कढत होतं;
आता कुणी नाही, काही नाही
चालले आहे मी पलीकडे, खूप खूप पलीकडे,
सुखदुःखाच्या पलीकडे ( हुंदके देते ) दूर ! — दूर—

धृतराष्ट्र — गांधारी, गांधारी काय आहे हे ?
कसला गलबला, कसली रडारड आहे ?
काही वार्ता आली का ?
माझ्या सुयोधनाचं क्षेम आहे ना ?
बोल, बोल गांधारी, गांधारी—

गांधारी — म्हणजे ! अग बाई हे !
यांना तर विसरलेच होते मी,
हा माझा नवरा आणि मी ह्याची बायको
आंधळी, डोळे बांधलेली,

टेकत चाललेली ! –
आता कसली जाते सुखदुःखाच्या पलीकडे ?

( करुण वाद्यसंगीत

त्यानंतर गदायुद्धाचे आवाज
' शाबास भीमा, ' ' शाबास दुर्योधना ' अशा
मधून मधून आरोळ्या– गदायुद्धाचे आवाज तीव्र व जलद
होत जातात–
मग मांडीवर थाप मारल्याचा आवाज. त्या-
बरोबरच
' हा अधर्म आहे भीमा, श्रीकृष्णा' अशी आरोळी
' युद्धात धर्म कुठला बळीरामा ? '
' युद्धाचा धर्म आला, तेव्हाच धर्म संपला '
' याने तरी कुठे धर्म पाळला ? ' इत्यादी गर्जना.
एक जोरदार गदेचा आघात–एक वेदनेची
किंकाळी–त्यानंतर एकदम सर्व शांत.

काही क्षणांनंतर करुण वाद्यसंगीत
प्रवेशांतर. )

## प्रवेश पाचवा

**स्थळ** – ( पहिल्या प्रवेशातला हिमालयातील आश्रम. वाऱ्याचा आवाज
बर्फवृष्टीचा पानांतून हलकासा शब्द. )

**धृतराष्ट्र** – सुखदुःखाच्या पलीकडं नाही,
तरी पुष्कळच दूर आलो आहो आपण
गांधारी,–या एकांत आश्रमात,

देवदारांच्या हिरव्या छायांत,
हिमालयाच्या तपःशीतल कुशीत
इथं झरतो बर्फ वासनांसारखा,
आणि सूर्यबिंबे तळपतात हिमशिखरांतून
इंद्रियोपभोगांतून झळकणाऱ्या अलिप्त आत्म्यासारखी !
रत्नकांत ! –

**गांधारी** – खरंच स्वामी, पुष्कळ गोष्टी ओलांडल्या आपण
गदेचे आघात, विधवा सुनांचे आक्रोश,
दुःखाचे घास आणि अश्वमेधाचे पुरोडाष;
आप्तांचे मोह पायथ्याशीच थांबले,
सेवकांचे सेवासुख खालीच राहिले,
इथं निवांत कुटीत उरलो तुम्ही आणि मी;
एकाच शुष्क कवचात दोन जुळे बदाम !

**धृतराष्ट्र** – वा ! दोन जुळे बदाम ! पण गांधारी कडू की गोड ?

**गांधारी** – परमेश्वराला माहीत. पण–
थट्टा पुरे झाली स्वामी,
आता थोडे गंभीर व्हा. हिमालयाच्या शिखरांच्या
सावलीत—

**धृतराष्ट्र** – तू गंभीर आहेस तेवढं पुरे आहे
पण गांधारी, हे वरीक नवल हं,
माहेरच्या बदामाची सय अजून विसरली नाहीस.

**गांधारी** – काय करायचं,
सासरचे बदाम कडू निघाले तर ?

**धृतराष्ट्र** – सासरचे बदाम कडू निघाले तर !
गांधारी, तुझा राग गेला नाही अजून,
सासरच्या माणसांवरचा
मलाही तू अजून क्षमा केली नाहीस

**गांधारी** – क्षमा महाराज ! कुणी क्षमा करायची ?

आणि कुणाला ? पण जाऊ द्या ते स्वामी,
गेलं ते गंगेला मिळालं. अन् खरंच महाराज,
आज आपण गंगेच्या काठाशीच उभे आहोत
किती सुंदर, नीरव, निवांत आहे हे स्थळ ! –
तुम्ही आणि मी, कुंती आणि विदुरभावोजी–
दुसरा मानवी शब्द ऐकू येत नाही
ऐकू येते पानांची सळसळ,
गंगेचा खळाळ,
पक्ष्यांची किलबिल,
आणि फुलांवर झुलणाऱ्या भ्रमरांचा गुंजारव
मानवी ईर्षेचा स्पर्श नाही यांना–
या शब्दांना; सारं सहज, उत्स्फूर्त, निर्हेतुक
आणि या शब्दांमागं
उभं हिमालयाचं मौन,
अचल, उत्तुंग, अथांग, हिमशुभ्र ! –
ज्यात कसली अपेक्षा नाही, खंत नाही,
फक्त आहे अढळ श्रद्धा. शून्याला भेदून उभे राहण्याची,
ऋषींच्या प्रार्थनेसारखी
स्वामी, इथं बसलं म्हणजे वाटतं
काही घडायचं नाही, काही घडलं नाही
कुरुक्षेत्राचं ते युद्ध, तो संहार
झाला नाही–कधीच झाला नाही–

धृतराष्ट्र – गांधारी अन् ती सुईच्या अग्रावरली जमीन,
दुःशासनाच्या रक्तानं माखलेली ती द्रौपदीची वेणी,
दुर्योधनाच्या मांडीवर झालेला तो गदेचा आघात,
परीक्षितीच्या गर्भाभोवती फिरणारं अश्वत्थाम्याचं
ब्रह्मास्त्र,
त्या ज्वालांनी पेटलेली पृथ्वी, आकाश,

कशाच्याच खुणा नाहीत इथं

**गांधारी** – सारं असत्य होतं, काही खरं नव्हतं ते महाराज,
की सारंच भीषण स्वप्न होतं.
असं वाटतं या हिमालयाच्या कुशीत—
मौनाच्या शुभ्र मुशीत !

**धृतराष्ट्र** – असं असूनही गांधारी,
तुला त्या वंचनेचा विसर पडत नाही.
मी आणि तुझ्या माहेरच्यांनी
तुझी फसवणूक केली,
कोटी कोटी अन्याय केले तुझ्यावर,
कबूल. पण तूही काही कमी केलं नाहीस
तूदेखील कोटीकोटी सूड घेतलास
त्या अन्यायाचा.

**गांधारी** – पाहिलंत महाराज, पुन्हा तो विषय काढलात,
तुम्हालाच ते कुठंतरी सलतंय
कसं सांगू स्वामी ? त्या किशोर वयात,
स्त्रीची जी वंचना होते,
ती फार अघोर असते,
कधीच ती, ती विसरू शकत नाही
उद्ध्वस्त होतं तिचं सारं जीवन
त्या एका विश्वासघातानं,
इतकंच नाही, पुढच्या पिढ्याही जळून जातात
त्या वंचनेच्या ज्वाळांत–

**धृतराष्ट्र** – आम्ही कुरुकुलातल्या पुरुषांनी,
कबूल, गांधारी, कबूल
फार अन्याय केले तुम्हा स्त्रियांवर;
आणि त्याचं प्रायश्चित्तही आम्हाला मिळालं.
भीष्म अंबेच्या रागात जळाला,

मी तुझ्या कोपात जळतो आहे
माझी मुलंही त्यातच जळून मेली !
पण —कुंती !
मी तुझ्यावर अन्याय केला,
पंडूनंही कुंतीवर अन्यायच केला,
पण ती कुंती !— त्या कुंतीनं

**गांधारी** – त्या अन्यायाचा सूड घेतला नाही,
असंच म्हणायचं ना तुम्हाला स्वामी ?
कुंतीचं लग्नदेखील व्यंग माणसाशी झालं
पण तिनं पत्नीचंच कर्तव्य पार पाडलं,
हेच सांगायचं ना तुम्हाला ?

**धृतराष्ट्र** – नाही, वेगळंच म्हणायचंय मला,
मी तुझ्यावर अन्याय केला,
पंडूनं कुंतीवर अन्याय केला,
पण मला आणि पंडूला जे दुःख, जी विफलता
भोगावी लागली, ती कोणामुळं ?
कुणाचा अन्याय आम्हाला भोवला ?
आमच्या आयांचा मूक, अगतिक तळतळाट तर
आम्हाला भोवला नाही ? बिचारा विदुर ?

**गांधारी** – विदुर बिचारा का ?
फार थोर महात्मा आहे तो

**धृतराष्ट्र** – ते खरं, पण तरीही तो बिचाराच,
कसं सांगू ?– तो अंगानं सुदृढ होता,
बुद्धीनं चतुर होता, त्याच बापाचा होता,
परंतु दासीपुत्र होता,
म्हणून त्याला राज्यावर बसवलं नाही
शेवटी घोर वंचना झाली त्याची !
दासीपुत्र, हा का त्याचा गुन्हा होता ?

पण त्यानं या वंचनेचा, या वैफल्याचा सूड
कुणावर घेतला नाही
उलट त्यानंच फार काळजी वाहिली कुलाची
सतत जागरुक राहिला, झिजत राहिला,
कुंतीही तशीच, कल्याणच पाहिलं तिनं कुलाचं
कुणाच्या अन्यायांचा सूड घेतला नाही.

**गांधारी** – महाराज ती फार थोर माणसं
दुःख सोसणारी, कुणाचा राग न करणारी,
धर्मात्मे आहेत ते
आम्हा पामरांना त्यांची सर कशी येणार ?

**धृतराष्ट्र** – विदुर, कुंती आणि मी
तीन पिढ्यांतली आम्ही तीन माणसं
आम्ही तिघंही वंचित आहोत गांधारी.

**गांधारी** – वंचित झाला म्हणून महाराज,
दुसऱ्याची वंचना करण्याचा अधिकार तुम्हाला
कसा प्राप्त होतो ?

**धृतराष्ट्र** – थांब, गांधारी, मला बोलू दे,
क्षमा हवी म्हणून हे बोलत नाही मी.
तुझ्यासाठीच सांगायचं आहे हे
आयुष्याशी चाललेला तुझा झगडा मिटावा,
माझ्यावरचाच नव्हे, जगावरचा तुझा राग
सरावा,
म्हणून बोलत आहे मी हे
मी केला असेल अन्याय तुझ्यावर,
म्हणून मुलाबाळांवर, साऱ्या संसारावर
अन्याय करायचा अधिकार तुला मिळतो काय ?
अन्यायानं, अन्यायाचं परिमार्जन होतं काय ?
गांधारी, पाहा –

गांधारी – काय पाहू ? मी तर पट्टी बांधली आहे महाराज.

धृतराष्ट्र – तेच म्हणतोय मी गांधारी,
आता तरी ते वस्त्र सोड डोळ्यावरचं
सर्व आयुष्य डोळे बांधून जगलीस
मरू तरी नकोस डोळे बांधून
उघड्या डोळयांनी मर,
साठवीत डोळ्यांत हे निळं निळं आकाश !
ती पट्टी, तो राग, सोड जगावरचा गांधारी,
त्यांच्याकडं निरपेक्ष दृष्टीनं पाहायला शीक
गांधारी, गांधारी—
पाहा किती आनंद असतो गांधारी, नुसतं निर्भय
पाहाण्यात.

गांधारी (अचानक) – हे पाहा महाराज, मी डोळे सोडले आहेत.
स्वामी, मला नीट दिसत नाही
पण मी डोळे सोडले आहेत
हे पहा, इथं–इथं हे डोळे– (त्याचे हात हातात
घेऊन)
इथं हात लावा हं, चांगलं हात लावून पाहा,
सांगा, सोडलेत ना मी डोळे ?– स्वामी–

धृतराष्ट्र – गांधारी, गांधारी–(तिचे डोळे चाचपीत)
खरंच गांधारी तू डोळे सोडले आहेस !
किती मोठे आहेत ग तुझे डोळे ! तुझ्या पापण्या !–
गांधारी, किती सुंदर आहेत हे तुझे डोळे !
अहाहा ! किती आनंद झाला ! – गांधारी,
गांधार लागला आज जीवनात ! –
गांधारी हेच जर पूर्वी, फार पूर्वी –
त्या पहिल्या रात्री घडलं असतं तर !

गांधारी – तर काय ! घडलं नाही झालं, जाऊ द्या ते

पण खरं सांगा, अगदी खरं सांगा हं –
हसू नका हं– बघा,
आवडले ना तुम्हाला माझे डोळे ?

**धृतराष्ट्र** – ( हसत ) आवडले, आवडले, खूप खूप आवडले,
म्हणूनच उघडायला सांगितले गांधारी,
पुन्हा एकदा हात फिरवू दे या रेशमी पापण्यांवरून.
या दिपत्या डोळ्यांवरून,
डोळ्यांतल्या श्रांत कमळावरून
कमळातल्या सरत्या रात्रीवरून

**गांधारी** – चला, पाहील कुणीतरी
म्हातारपणी असं वेड शोभतं का ?

**धृतराष्ट्र** – आंधळ्याला शोभतं गांधारी.
कमळांना डोळे उघडायला लावणारा सूर्यही
माझ्यासारखाच अंध असावा
म्हणून फुलांचे डोळे उघडण्यात –
रोज रोज असे उघडण्यात–
त्याला इतका आनंद होत असावा. ( डोळ्यांवरून
हात फिरवतो )

**गांधारी** – आता पुरे हं. नाहीतर रागवेन मी
पण महाराज सूर्याला अंध कसं म्हणता ?
जगाचा नेत्र आहे तो.

**धृतराष्ट्र** – असूदे. तू माझा नेत्र आहेस एवढं खरं.
गांधारी, एक सांगू ?
गैरसमज करायचा नाही, तू लहान आहेस
माझ्यापेक्षा. मी जरठ–जीर्ण झालो आहे
मी गेल्यावर,
स्वतंत्रपणे राहता येईल तुला
आता संपला तुझा परावलंबीपणा.

गांधारी – हं–हं–असं अभद्र काय बोलता स्वामी ?
या परमोच्च आनंदाच्या वेळी–
इतका आनंद मी कधीच पाहिला नाही–
हा हात मी आता सोडणार नाही
मी जे डोळे उघडले आहेत ना ?
ते माझ्यासाठी नाहीत,
ते आपल्या दोघांसाठी आहेत.
हे तुमचेही डोळे आहेत स्वामी.

धृतराष्ट्र – कबूल, कबूल, गांधारी, सारं कबूल
पण तुम्हा डोळसांना जे दिसत नाही,
त्याचा आम्हाला वास येतो, ऐकूही येतं ते !
रानात कुठं वणवा लागला आहे ना ?
सकाळपासून मला धुराचा वास येतो आहे
भ्याड पाखरांची चिवचिव वाढते आहे
मला वाटतं, नदीच्या ह्या काठाला,–
आपल्या मागं, कुठं रान पेटलं आहे,
उष्ण झळाही शिवून जात आहेत

गांधारी – खरंच, महाराज, पर्णकुटीमागे,
केवढं तरी रान पेटलं आहे स्वामी,
पाहा कशा वळवळत येत आहेत
लाल पिवळ्या जिभा फडफडत्या ज्वाळांच्या !
बावरली पाखरं धुरात गरगरताहेत,
पुन्हा आगीकडेच झेपावून जात आहेत
त्या वणव्याची सहस्र प्रतिबिंबे वाहात येत आहेत,
नदीच्या पाण्यातून लाल लाल, जवळ जवळ–

धृतराष्ट्र – म्हणूनच गांधारी, तुला जड जाणार आहे,
वाटतं त्यापेक्षा जड जाणार आहे धरून ठेवणं,
माझा हात असा, शेवटपर्यंत.

मी थांबणार आहे इथंच;
सहज जाता येईल तुला नदीपार
कंटाळा आला आहे मला बसून राहण्याचा,
या आश्रमात वाट पाहात रोज मरणाची
आता ते सहज पुढून येत आहे,
थांबणार आहे मीही इथंच त्या वणव्याला भेटायला
तू जाऊ शकतेस, तुला डोळे आहेत,
मोकळे, स्वतंत्र.

**गांधारी** – नाही, स्वामी नाही, शक्य नाही ते.
वणव्याला पाहून भिऊन पळणारे
हे डोळे नाहीत, अजाण हरिणांचे–
अन् वणवे तरी काय थोडे पाहिले आहेत
महाराज, आतापर्यंत–
नाही, मी हात सोडणार नाही.
कुरुराज, क्षत्रिय आहो आपण
इथं बसून वाट पाहण्यापेक्षा
वणव्यालाच आपण सामोरे गेलो तर !

**धृतराष्ट्र** – जशी तुझी इच्छा
चल तर मग गांधारी–
शेवटी गांधारी, तू डोळे उघडलेस
तो हा वणवा पाहण्यासाठीच का ?
जीवन नव्हे, मरण बघण्यासाठीच का ?

**गांधारी** – असं पाहा महाराज, हा आपला माणूस
आईच्या कुशीतून जेव्हा बाहेर येतो,
रडतच डोळे उघडून पाहतो,
आईच्या मांडीवर मधूनच हसतो,
तेव्हा त्याला वणवे दिसत नसतात;
कारण त्याच्याही डोळ्यांवर बांधलेली असते

एक अदृश्य पट्टी,
अज्ञाताची, नियतीची !

धृतराष्ट्र — आणि आता ती पट्टी तू
सोडली आहेस—
असंच ना गांधारी ? मग म्हणूया—ही प्रार्थना :
ओम् नमो अग्निनारायणाय—

गांधारी — ओम् नमो अग्निनारायणाय !
हे अग्निनारायणा,
आमच्या डोळ्यांत जे तेज आहे,
जी दृष्टी आहे,
तोच तू हा वणवा आहेस
अग्नी आहेस
ओम् नमो अग्नि नारायणाय !

धृतराष्ट्र — तूच या फुलांत हसतोस
फळांत पिकतोस
नक्षत्रांत विलसतोस
सूर्यात तळपतोस
अग्निनारायणा, तोच तू हा वणवा आहेस,
ओम् नमो अग्निनारायणाय !

गांधारी — आमच्या पोटात तू जठरानल आहेस
आमच्या रक्तात तू प्राणांची ऊब आहेस
आमच्या बुद्धीत तू महत्त्वाकांक्षा आहेस
प्रेम आहेस आमच्या हृदयात
आमच्या जीवनात तूच झळकतोस
आमच्या मरणात तूच प्रकाशतोस

ग्रंथ संग्रहालय ... शाखा (स्थक
२५५७०
२५३३४
०१।९।८५

दोघे – ओम् नमो अग्निनारायणाय
हे अग्निनारायणा तुला नमस्कार असो,
नमस्कार असो.

( दोघेही वणव्याच्या दिशेने चालत जातात
काही क्षण पावलांचा आवाज–नंतर ज्वाळांचा
धडधडाट. खिन्न करुण संगीत. तेही हळूहळू विरत
जाते. सूर्याच्या आवरत्या किरणांसारखे ).

# विसर्जन

## दृश्य–पहिले

**स्थळ** – द्वारकेजवळचा समुद्रकाठ – प्रभासवन. उद्धव व अक्रूर बोलत येत आहेत.

**अक्रूर** – उद्धवा, कुठं आहेत श्रीकृष्ण ?
पाहिलंस तू त्यांना ?

**उद्धव** – नाही अक्रूरा, शोधतो आहे मी त्यांनाच
आता इथं होते बोलत बलरामाशी

**अक्रूर** – बलराम ! त्यांनी समुद्रतीरावर
केव्हाच विसर्जन केला आपला देह
निरोध करून प्राणांचा, बाहेर पडला
त्यांच्या मुखातून एक सहस्रमुख सर्प
समुद्रात तो अदृश्य झाला,
तेजाच्या झोतासारखा सळसळत
झळाळून उठली लाटालाटांतून लाल आरुणी प्रभा
त्याच्या मस्तकावरील मण्यांची
की त्याच्या खदिरांगार डोळ्यांची ?

**उद्धव** – भगवान शेष अन्तर्धान पावले
पण भगवान द्वारकाधीश कुठं आहेत ?
का सोडलं त्यांनी आम्हांला
या विनाशाच्या वेळी ?

**अक्रूर** – विनाश ! अरे प्रलयकाळ ओढवला आहे उद्धवा,
मदिरेनं बेभान झालेले यादव

घालीत आहेत कंठस्नान परस्परांना
आवरत नाहीत ते कोणालाच
अशा वेळी श्रीकृष्ण गुप्त झाले !

उद्धव – गुप्त नाही झाले अक्रूरा,
गेले असतील महालात
आकांत मांडला आहे तिकडे यादव-स्त्रियांनी !
पण अक्रूरा, काही बरी नाहीत ही चिन्हं
पहा ऊन कसं पिवळं पडलं आहे,
- कावीळ झाल्यासारखं !

अक्रूर – अन् ते पहा, सूर्यबिंबाभोवती
कबंधं नाचत आहेत, एकमेकांना मागीत
आपली तुटलेली मस्तकं;
उद्धवा, लाटालाटांतून समुद्राच्या
भुंकत आहेत भाल्ड !

उद्धव – ही दुश्चिन्हं सतत होत आहेत
गेल्या आठ दिवसांपासून
श्रीकृष्णाला सांगितलं तेव्हा—

अक्रूर – काय म्हणाले ते उद्धवा ?

उद्धव – काही नाही, हसले आणि पाहू लागले
गवाक्षांतून रक्तरंजित संध्येकडं,
आपल्याच भळभळत्या जखमेकडं पाहणाऱ्या
स्तब्ध नजरेनं.

अक्रूर – काय आहे त्यांच्या मनात
कळत नाही, उद्धवा,
भीषण संहारात कुरुक्षेत्राच्या
ते निष्कंप होते,
हे एक वेळ समजू शकतं
न्यायाचा, कर्तव्याचा प्रश्न

पणास लागला होता तिथं—

उद्धव — पण इथं— इथं बघवतात तरी कशा त्यांना
अक्रूरा, आपल्या अपत्यांच्या मरणकळा ?
ते स्तब्ध आहेत उभे :
आपल्या झडत्या पिवळ्या पानांकडं पाहणाऱ्या
निभ्रान्त वृक्षासारखे

अक्रूर — त्या वृक्षाला उद्धवा, ऐकू येत असते
येणाऱ्या वसंताची चाहूल,
आपल्या फांद्यांच्या नसानसांतून
तारे गाळणारं आकाश निश्चित असतं
उद्धवा, आपल्या अंधारात,
सकाळच्या सोनेरी किरणांविषयी
यादवांच्या या रक्ताच्या थारोळ्यांत
त्यांना दिसतात थिबलेल्या
कुठल्या नभाच्या केशरी कडा ?

उद्धव — त्या वृक्षाप्रमाणे, त्या आभाळाप्रमाणे
या श्रीकान्तालाही दिसत असेल का अक्रूरा,
तो हिमान्ताचा क्षण, ती निशान्ताची घटिका ?

अक्रूर — ते मला माहीत नाही उद्धवा,
पण एवढं जाणतो मी,
विसर्जनाची अनिवार कला आहे
श्रावणाच्या मेघाची ! ह्या घनश्याम व्यक्तित्वात
विसर्जनाच्या क्षणातच स्फुरतं सर्जन
त्याच्या भव्य जीवनाचं;
कर्तव्याच्या क्षणानं भरतो तो जीवनाचा अमृतकलश
आणि हा कलश भरता भरता, प्राशन करतो
स्वतः हलाहलाचा प्याला
कळू न देता आपल्याही ओठाला,

ओठावरच्या हास्याला!
गोकुळाहून निघालो मी घेऊन बाळकृष्णाला
तेव्हा अडविला रथ गोपिकांनी
राधिकेनं तर लोटला आपला सोन्याचा देह
रथचक्राखाली, म्हणाली —

( दृश्यांतराचे गंभीर सूर )

## दृश्य दुसरें

[ त्या स्वरांच्या पार्श्वभूमीवर संथपणे येणारा रथाचा आवाज ]

राधा — मुकुंदा, जाऊ नकोस रे गोकुळ सोडून,
परदेशी करून आम्हाला
गोपाळा, का रे निष्ठुर झालास ?
विसरलास वृजलाला, आम्हाला ?–
गळ्यातल्या फुलमाळा सुकल्या नाहीत तोच,
वृक्षावरली चंदन-चित्रे पुसली नाहीत तोच–
मेघश्यामा, राहणार नाहीत हे प्राण तू गेल्यावर
माधवा ऐक, ऐक, आमच्या हृदयाची ही हाक–
श्रीकृष्ण — पण राधे, ऐकू येत आहे मला
दुसरीही एक हाक— मथुरेची हाक–
खड्गाच्या जिभांची, ज्वालांच्या शब्दांची
रथचक्राच्या घनघोर गडगडाटाची हाक–
त्या हाकेलाही 'ओ' दिली पाहिजे मला.
राधा — म्हणजे आमच्या हाका काहीच नव्हेत
म्हणजे आम्ही कोणीच नव्हत माधवा, तुझ्या!

बारा गाव वणव्यातून, मुसळधार पावसातून
का वाचवलंस आम्हाला ? का तोललास तो गोवर्धन ?
कोसळू का दिला नाहीस आमच्यावर ?–म्हणजे
आम्ही राहिलोच नसतो, राहिला असतास मोकळा तूही
या हाकांच्या दिशेनं जाण्यासाठी–त्या–त्या–
कुब्जेकडं–

श्रीकृष्ण – राधे, असंच तुला वाटत असेल तर
राहतो इथं धेनु राखीत, वेणु वाजवीत
आणि पुन्हा धेनूच राखीत !

राधा – काही नको, जा तू; खुशाल जा,
मात्र जाताना बुडवून जा आम्हांला
या काळ्या डोहात यमुनेच्या !
हेच तुला करायचं होतं वनमाली, तर
का लोटलं नाहीस मला त्याआधी
त्या कालियाच्या मुखात ?
कळलं नसतं कुणालाही ही मेली
कालियाच्या विषानं !–
की विरहाच्या जहरानं !

श्रीकृष्ण – राधे, दुःखानं असं उलू नकोस
भलतं बोलू नकोस, अन् उलायचंच तर
माणसानं उलावं डाळिंबाप्रमाणं,
इंद्रधनूच्या रंगाचे रसमधुर दाणे पोटी धरून.

राधा – गोविंदा, बोलायला सोपं आहे हे फार
डाळिंबाचं भाग्य साऱ्यांनाच लाभत नाही;
काहींची नशिबं दगडांचीच असतात,
तापून उलतात, फुटतात
स्त्रीचं भाग्य असंच असतं
बरसत्या घनाचा, लसलसत्या पात्याचा

शीतळ, हिरवा दिलासा मिळतो काही काळ,
नंतर सारा उन्हाळा–भाजणारा, जाळणारा!
माधवा, खरंच का असा उन्हाळा
लिहून जाणार आहेस आमच्या भाळी ?
यमुनेचा तो सुंदर काठ,
मुरलीचे ते धुंद मंथर सूर,
स्वरांच्या काठावरील त्या चांदण्या रात्री,
कदंबातळीचे चांदण्याचे कवडसे,
त्या कवडशांच्या शपथा!—
सारं सारं विसरलास तू ? गोपाळा सांग,
सांग ते सारं खोटं होतं का ?

श्रीकृष्ण — ते सारं खोटं नव्हतं राधे,
आणि हेही खोटं नाही.
दिवसाला सामोरे जाताना हरवून जातात
चांदण्याचे कवडसे

राधा — कवडसे हरवले म्हणून नंदलाला,
माणसं हरवत नाहीत,
त्यांची हृदयं हरवत नाहीत,
सूर हरवले, तरी गिरिधरा,
त्यांचे अर्थ हरवत नाहीत.
असा भलत्याच गावाला का जातोस गोविंदा,
वेड पांघरून मोत्यांच्या घोंगडीचं ?
राधेचा कंटाळा आला तुला ?
सरलं तुझं प्रेम ?

श्रीकृष्ण — माझं प्रेम राधे, सरलं नाही
पण ते आटेल असं वाटतं,
तुझ्या या वेडेपणामुळं—
तुझ्या या हट्टामुळं—

राधा — नाही, नाही माधवा, नाही
तुझा विरह चालेल, पण तुझ्या प्रेमाचा मृत्यु—
नाही, मला तो सहन होणार नाही
माधवा, सहन होणार नाही रे. मुकुंदा—
श्रीकृष्ण — राधे, माहीत होतं मला,
तू हेच म्हणणार, हे मला माहीत होतं
म्हणूनच मी तुझ्यावर प्रेम केलं, प्रेम करतो—
वयाची, लोकांची, साऱ्या लौकिकाची बंधनं तोडून,
मी तुझ्यावर प्रेम करतो—
सार्थक झालं त्या प्रेमाचं.
खरं प्रेम जीवनाला वाट करून देतं ! खरं ना ?—
राधा — ( अस्फुटपणे )—मनमोहना, ब्रिजलाला—
श्रीकृष्ण — तुझं प्रेम, तुझं सुंदर दुःख घेऊन मी जात आहे
ठेवून जात आहे माझं प्रेम, माझं दुःख
तुझ्या हृदयात, वेणूच्या स्वरासारखं,
मधुर, अमर होणारं, आपल्या अबोल व्यथांनी.
अक्रूरा, हाकार रथ लौकर पुढं —
राधा — थांब, मुकुंदा, थांब,
क्षणभर पाहू दे तुझं रूप
हृदयात साठवून घेऊ दे, आणि —
ती वेणु तेवढी मला दे,
तिच्या मुक्या मुखातून फुलत राहतील
प्रीतीचे सूर, नक्षत्रांसारखे माझ्या एकाकी रात्रीत
त्या रात्रीत मी विरत राहीन
क्षणाक्षणाने, कणाकणाने
तुझी उद्याची प्रभात होण्यासाठी.
आणखी एकच शब्द
तू आठवण काढशील तेव्हा मी येईन—

धावत येईन
तेवढी अनुज्ञा दे, एवढं ऐक माझं —
काढशील माझी आठवण ?

श्रीकृष्ण – तुझी आठवण नेहमीच राहील राधे,
ती कशी विसरणार ?—
पण त्या आठवणीला नसतील शब्द
रुंझी घालणाऱ्या भ्रमराचे,
गाझ असेल,
शून्याला साद घालणाऱ्या सागराची,
पृथ्वीला कवटाळून रिते राहणाऱ्या
समुद्राच्या मिठीची, राधे—

राधा – माधवा–माधवा–

[ दृश्यांतराचे करुण सूर, रथ धडधडत जाताना. ]

## दृश्य तिसरे

( पुन्हा समुद्रकाठ, पहिल्या दृश्यातला, उद्धव अक्रूर बोलत असतात. )

अक्रूर – मीलनाच्या धुंद, उत्कट क्षणीच उद्धवा,
विसर्जन केलं त्यानं आपलं प्रेम असं
आणि तो पुढे निघाला–
नद्या-पर्वत लंघून, मथुरेच्या वेशी फोडून,
कंस–चाणूरांच्या प्रेतावरून
सिंहासने तोडीत, छत्र-चामरे मोडीत
अष्टनायिकांच्या फुलमाळा गुंफीत, मधून मधून–
तो निघाला पश्चिम समुद्राकडं

अन् लाटांच्या तुफान वादळात बांधली,
त्यानं एक नगरी सोन्याची,
रानटी ऋक्ष-जांबुवंताशी त्यानं नातं जोडलं,
सोयरीक केली वनवासी पांडवांशी,
बंधमुक्त केले बावीस हजार राजे
जरासंधाच्या बंदीवासातून
शिशुपालाचा वध करून,
मुक्त केली पृथ्वी चक्रातून दमनाच्या
जिंकले राजे,
परंतु राज्याचा, भूमीचा अपहार केला नाही
जुल्म संपताच पुन्हा शस्त्र हातात धरलं नाही
योद्धा म्हणून मिळवलेली कीर्ती
विसर्जित केली त्यानं कुरुयुद्धात
शस्त्रसंन्यास अवलंबून
अन् अश्वांचे रश्मी हातात धरून
निःपात केला कौरवांचा
न्याय मिळवून दिला पांडवांना
न्यायालाही शेवटी अर्थ उरला नाही त्या,
अश्वत्थाम्याच्या अमानुष संहारापुढं
गर्भाकडं उत्तरेच्या प्रेरिलं त्यानं
ब्रह्मास्त्र अनावर झालेलं.
अठरा अक्षौहिणी सैन्याच्या विनाशानंतर
उत्तरेच्या गर्भात उगवलेला उद्याचा अंकुर,
संस्कृतीचा कोंभ
जळू पाहात होता त्या अस्त्राच्या ज्वालेत,
तेव्हा श्रीकृष्णाला आठवण झाली
आपल्या सुदर्शनाची
[ दृश्यांतराचे सूर, जलद होत जाणारे ]

(कुरुक्षेत्राजवळच्या जंगलातील एक शिबिर. सभोवती रान पेटलं आहे. श्रीकृष्ण, द्रौपदी, धर्म आणि अश्वत्थात्मा)

**श्रीकृष्ण** – थांब, अश्वत्थाम्या, अधमा, थांब,
तुला असा जाळू देणार नाही
हा उद्याचा अंकुर उत्तरेच्या गर्भातला
क्षणभर आवर ते ब्रह्मास्त्र
मी सुदर्शनाचं स्मरण करीत आहे

**अश्वत्थामा**–भगवंता, अनावर आहे ते मला.

**श्रीकृष्ण** – अश्वत्थामा, तुम्ही योद्धे म्हणवता
शस्त्रांची उपासना करता
परस्परांच्या पराभवासाठी
पण ते शस्त्र उलटलं, अनावर झालं,
म्हणजे खुशाल चालवता दुबळ्या जिवांवर
निष्पाप गर्भावर,
मानवतेच्या, संस्कृतीच्या उगवत्या पिढ्यांवर.
नाही, मी हे घडू देणार नाही.
पुन्हा शस्त्र धरीन, रक्षण करीन
गर्भाचं नव्या जगाच्या,
प्रतिज्ञा मोडूनही शस्त्रसंन्यासाची

**धर्म** – नका, प्रतिज्ञा मोडू नका भगवन्,
या दुबळ्या धर्माच्या जगासाठी.
धर्मानं जगावं आपल्याच तत्त्वावर
वासुदेवा, धर्माला राज्य मिळालं
द्रौपदीला लाज मिळाली
आणि पांडवांना मिळाला न्याय,
पण त्यांचा धर्म अक्षुण्ण राहिला नाही, अक्षत राहिला नाही
म्हणून त्या लज्जेचा, त्या न्यायाचा वंशच

आता संपण्याची वेळ आली आहे
शस्त्रानंच नष्ट होणार आहे,
शस्त्रानं जिंकलेलं
तुम्ही आपली प्रतिज्ञा का मोडता त्यासाठी
मधुसूदना ?
श्रीकृष्ण — धर्मा, प्रतिज्ञा करायच्या असतात
न्यायाच्या, कर्तव्याच्या रक्षणासाठी
आणि त्यासाठीच
मोडायच्याही असतात त्या कधी कधी
भीष्मानं हे ओळखलं नाही
म्हणूनच झाला तो संहार कुरुक्षेत्रावर
द्रौपदी — बरोबर आहे श्रीकृष्णा, तू ऐकू नकोस या धर्मराजाचं
अश्वत्थाम्याचं अस्त्र निष्फळ झालं पाहिजे
उत्तरेच्या गर्भाचं रक्षण झालं पाहिजे,
मी म्हणते आवरत नाहीत तर
धरतात कशाला शस्त्रं-अस्त्रं हे वीर ?
अश्वत्थामा—द्रौपदी, साऱ्याच शस्त्रधरांची
शोकांतिका आहे ही ! सूड असतो मनात
शस्त्र हातात असेपर्यंत, पुढं
शस्त्र गेलं तरी सूड जात नाही
द्रौपदी — अश्वत्थामा, आम्हाला नको सांगूस
पराभवाचं हे शहाणपण
अरे द्रोणपुत्रा, धृष्टद्युम्नाचा तू वध केलास,
मारलेस झोपेत माझे पाच पुत्र, भ्याडपणानं, अन्यायानं,
इथपर्यंत समजू शकले मी सूडाचा अर्थ,
परंतु उत्तरेच्या गर्भावर आघात !—
नाही, कोणाही स्त्रीला, कुठल्याही मातेला
हा आघात सहन होणार नाही.

श्रीकृष्णा, या अघोरकर्म्याला
मिळालं पाहिजे अघोर शासन त्याच्या भ्याडपणाचं,
भेकड शस्त्रबळाचं
प्रतिशोधालाही एक वेळ क्षमा करता येईल,
पण या भ्याड विश्वासघाताला,–
अविचारी क्रौर्याला, हिंसेला क्षमा–

धर्म – द्रौपदी, असा भेदभाव नसतो क्षमेपाशी
क्षमा सर्वश्रेष्ठ तशी समदर्शीही असते

द्रौपदी – हे पटायचं नाही तुम्हा अक्रोधाला,
अजातशत्रूला, पण धर्मराज,
ती क्षमा या अधमासाठी नाही.
यानं अंत केला साऱ्या माणुसकीचा
जाणूनबुजून हा नाश करू पाहतो आहे
नव्यानं जन्मास येऊ पाहणाऱ्या
एका निरागस जीवात्म्याचा,
ज्याचा संबंधही नाही याच्या हिताहिताशी
जयापजयाशी.
श्रीकृष्णा, अजयाकार झाला
आमचा जय
ह्याच्या या अघोर कृत्यानं
धर्मानं क्षमा केली, तरी
एक आई त्याला क्षमा करू शकणार नाही,
कधीही नाही.

अश्वत्थामा–द्रौपदी, मलाही नको आहे तुमची क्षमा
हे प्राणही नको आहेत
परंतु या चिरंजीवित्वानं माझा नाश केला आहे
मी ब्राह्मण उरलो नाही, क्षत्रियही बनलो नाही,
विद्या हरलो, शौर्य विसरलो

पिता, मित्र सारे गमावून बसलो
प्रेमाचा तर स्पर्शच झाला नाही
कुणी माझ्यावर प्रेम केलं नाही
मी कुणावर प्रेम करू शकलो नाही.
सर्व जग माझा तिरस्कार करीत आलेलं आहे
आता मलादेखील माझी घृणा वाटत आहे
एखाद्या कुष्ठरोग्यासारखी !
मी कोण आहे हेच मला समजत नाही
असह्य आहे ही आत्मविस्मृती
स्वतःलाच जाणवणारं हे भयंकर परकेपण,
वैरीपण आपलं आपल्याशी
नको आहे मला असं कोंडलेलं,
विकृत जीवन !

**श्रीकृष्ण** — तेच तुला भोगलं पाहिजे
तुला जिवंत राहिलं पाहिजे अश्वत्थामा,
फार भयंकर असतात, मृत्यूपेक्षाही—
या विकृत आत्मविस्मृतीच्या यातना
त्या तुला भोगल्या पाहिजेत !
हिंडत राहिलं पाहिजे तुला
पिशाच होऊन आपल्याच उद्ध्वस्त हृदयात,
दारोदार तेल मागीत,—
आपल्या जखमेसाठी चिरंतनाच्या
धर्मा, याच्या मस्तकातील मणि काढून घे
याला भटकू दे पिशाच होऊन,
कल्पांतापर्यंत

**अश्वत्थामा**—फार कठोर शिक्षा आहे ही श्रीकृष्णा,
पण ती मी स्वीकारतो
माझ्या पापाचं प्रायश्चित्त म्हणून;

असंच भटकावं लागतं पिशाचाला, शस्त्रपिशाचाला
परंतु या पिशाचानं पराभव केला एका तत्त्वज्ञाचा,
शस्त्र धरायला लावलं त्याला.

**श्रीकृष्ण** — हरकत नाही पिशाचा,—
ते शस्त्र हत्येसाठी नाही, रक्षणासाठी आहे

**अश्वत्थामा**—तरी पण एकच ते—एकच ते यादवेंद्रा,
कुठं रक्षण होतं, कुठं हत्या—
जातो मी
[ विकट हसतो ]

**सत्यभामा**—[ प्रवेशत ] घात झाला महाराज, घात झाला
अजून तुम्ही इथंच थांबलात ?
तिकडं उत्पात मांडलाय यादवांनी द्वारकेत

**द्रौपदी** — काय झालं भामे ?

**सत्यभामा**—काही नाही, तुम्हा पांडवांच्या नादानं, पांचाली,
ह्यांनी संहार ओढवून घेतलाय यादवांचा

**श्रीकृष्ण** — काय सांगतेस काय ? सत्यभामे,
शुद्धीवर आहेस ना ?

**सत्यभामा**—सारे यादव बेफाम झालेत मद्य पिऊन
त्यातली थोडी मलाही चढली असेल महाराज,
तर आश्चर्य कसलं !

**द्रौपदी** — आल्यापासून भामे, काय मांडलंस हे
काय बोलते आहेस भलतंसलतं, तोंडाला येईल ते ?
थोडं बस, प्रवासानं शिणली असशील
आधी थोडं रस-सेवन कर अन् मग बोल

**सत्यभामा**—या द्राक्षासवानेच प्रलय मांडला आहे
उन्मादात एकमेकांची हत्या करीत आहेत
ते यादव द्रौपदी, नको मला हे द्राक्षासव.

**श्रीकृष्ण** —भामे, मद्यानं नाही, सत्तेनं उन्मत्त झाले आहेत ते !—

सत्यभामा—म्हणजे स्वतःला कल्पना आहे तर
तरीही स्वस्थ बसलात ! यादव कोण तुमचे ?—
सारे काही पांडव, पांडव !

द्रौपदी —अग ते निघालेच होते—
पण भामे, इतका द्वेष का करतेस पांडवांचा तू ?
त्या अश्वत्थाम्यामुळं, पांडवपुत्रांची हत्या करणाऱ्या त्या
अश्वत्थाम्यामुळं—

सत्यभामा—मी पण तेच म्हणत होते द्रौपदी,
सदा कदा पांडव, पांडव-पुत्र—
त्यामुळंच ह्यांचं यादवांकडं लक्ष राहिलं नाही
तुमच्या युद्धात यादवांतल्या दुहीचाही
त्यांनी विचार केला नाही
आज हा प्रसंग उभा ठाकला !
यादव उभे आहेत बाण रोवून
एकमेकांच्या कंठांवर
बाण नसेल तर लव्हाळ्यांनी मारीत आहेत
परस्परांना, अन् त्या लव्हाळ्याला,
समुद्रातल्या ' एरका ' गवताला
प्राणांतिक धार आली आहे सुडाच्या तरवारीची

द्रौपदी — भामे, हा तो शाप भोवतो आहे
सांबाला मिळालेला, त्या तपस्व्याचा—

सत्यभामा—कुणास माहीत द्रौपदी, त्या ऋषीचा का गांधारीचा ?
मला वाटतं गांधारीचाच असावा;
आणि ह्या महाराजांनीच घेतला तो विकत,
तुम्हा पांडवांच्या हितासाठी, विजयासाठी,
किंमत देऊन यादवांच्या विनाशाची.

श्रीकृष्ण — भामे, पुरे झाला तुझा शहाणपणा
उगीच दोष देऊ नकोस पांडवांना

आपले भोग आपण भोगले पाहिजेत
सत्यभामा– ते सांगू नका मला
निवारण नसतं का करता आलं
त्या शापाचं तुम्हाला ?
पण तुमच्या मनातच नाही– अन्
आमचं ऐकतं कोण ?
श्रीकृष्ण – पुष्कळ आहे माझ्या मनात, पण ते
भामे, कळणार नाही तुला
शापाची भीती नसावी मनात,
भीती असावी पापाची;
तीच यादवांनी सोडली आहे
सत्यभामा–पण जबाबदार कोण त्याला ? तुम्हीच नाही का ?
श्रीकृष्ण – मी कसा ? भामे, राज्य वसुदेवाचं,
ते चालवताहेत बलरामदादा,
आणि प्रत्यक्ष सत्ता नांदते आहे यादववीरांच्या हाती
मी कोण तिथं ? माझा फक्त सल्ला
मानला तर मानला, नाही तर खाल्ला
श्रीखंडाबरोबर !
सत्यभामा–काही तरीच तुमचं बोलणं द्वारकाधीशा,
शेला झटकणं चाललंय नुसतं !
खरं म्हणजे तुम्ही असता कुठं जागेवर ?
द्रौपदी – श्रीकृष्णा, ही थट्टेची वेळ नव्हे
भामा दु:खानं व्यथित झाली आहे
प्रसंग मोठा गंभीर आहे.
पण भामे, म्हणून तुला शोभत नाही
इतकं लाघट बोलणं श्रीकृष्णाला
सत्यभामा–द्रौपदी वन्सं, चुकलं माझं
पण काय करू भानच राहात नाही

मला रागात.

द्रौपदी — बरं, वहिनी आता बसा थोडं,
श्रीकृष्णही थकले आहेत फार
अश्वत्थाम्यामागं करून धावपळ
आलात तसं धारेवरच धरलंत त्यांना
आता थोडं पादसंवाहन करा,
मी आत जाते तुमची सिद्धता करायला.

धर्म —भगवंता, मीही आलोच पाहून सिद्धता
तुमच्या प्रयाणाची (दोघे जातात.)

श्रीकृष्ण —आता बोल भामे,
काय, झालं काय तुला इतकं रागवायला
बिचाऱ्या पांडवांवर ?

सत्यभामा—नाथ, यादवांचा गुण नाही तरी वाण लागला मला
पण तुम्हीच सांगा, रागवू नको तर काय करू ?
इतकी काळजी घेता आहा तुम्ही
पांडवांच्या त्या टिचभर गर्भाची,
ज्यानं अजून प्राणही पुरते धरले नाहीत
आणि तिकडे प्राणान्त होत आहे कोट्यवधी यादवांचा !
पण तुम्हांला सवड होत नाही बघायला
तुम्ही सदा इकडे इंद्रप्रस्थात,
पांडवांच्या कल्याणात गुंतलेले !

श्रीकृष्ण — हूं—पांडव आणि यादव ? भामे,
खरं म्हटलं तर दोघांतही मी गुंतलो नाही
मी मुक्त आहे. पण ती मुक्ती ?—
छे, तीही खरी नाही, माणूस केव्हाच मुक्त नसतो
तो जन्मला की गुंतला
स्वतःचं वर्तन, कर्तव्य आणि सामाजिक संबंध
यांनी बद्ध होतो तो, जन्मापासून

या कोंडीत सापडतो
आरंभी घडतात काही कृत्यं त्याच्या हातून,
आपल्या ध्येयाच्या, कर्तव्याच्या प्रेरणेनं
पण पुढं त्यांना स्वतःचीच एक दिशा लागते;
त्या कृत्यांचंच
एक अटळ चक्र चालू होतं, ओढला जातो
माणूस त्या भोवऱ्यात अगतिकपणे
अन् गमावून बसतो स्वतःचं स्वातंत्र्य—
पण जाऊ दे ते; पांडवांच्या कल्याणासंबंधी
काही तरी सांगत होतीस ? बरोबरच बोललीस तू
पांडवांत गुंतलो मी, ते पीडितांच्या रक्षणासाठी
साधूंच्या, धर्माच्या परित्राणासाठी;
अन् गुंतलो यादवांत, निर्माण करण्यासाठी
या परित्राणाचं एक पीठ, एक केंद्र,
सोन्याची द्वारका !—
पृथ्वीला सोडून, तिचा स्पर्श टाळून,
समुद्र-वादळात उभारलेली, ती सोन्याची द्वारका !
माझ्या स्वप्नाचं प्रतीक !—
सारी स्वप्नं अशीच असतात भामे,
वादळात उभारायची
अन् अश्रूंत जिरवायची—सावकाश.
सोन्याची द्वारका, माझ्या स्वप्नाची द्वारका !—

**अक्रूर** — ( प्रवेशून ) ती द्वारका धोक्यात आहे, द्वारकाधीशा,
आज तुमची द्वारका संकटात आहे, ती डळमळत आहे,
प्रक्षुब्ध सागरात, झंझावातात विनाशाच्या !

**श्रीकृष्ण** — माहित आहे मला अक्रूरा, त्या स्वप्नाला
पहिला तडा गेला कौरवांच्या युद्धाच्या वेळी,
यादवांत दुही पडली तेव्हा,

अक्रूर — त्या दुहीचा यादवेंद्रा, आज कळस झाला आहे
भीषण हत्याकांड मांडलं आहे यादवांनी

श्रीकृष्ण — हत्याकांड ! अक्रूरा,
दुहीनं पोखरलेले, सत्तेनं उन्मत्त झालेले,
समृद्धीनं बेभान झालेले यादव
वेगळं काय करू शकणार यापेक्षा ?
सत्तामदानं, ते माणसं ओळखेनासे झाले आहेत
देव–ब्राह्मण, आपले–परके,
काहीच दिसेनासं झालं आहे त्यांना
भोज, अभीर हे आमचे लोक
आम्हीही मूळचे त्यांतले, त्यांच्यातूनच आम्ही वर आलो,
यादव राजवंश स्थापन केला, पण या यादवांनी
राजवंशाच्या अभिमानानं
त्या अभीरांनाच छळायला सुरुवात केली
त्यांची घोषवनं जाळली, स्त्रिया पळविल्या
ऋषि-मुनींचा उपहास केला, विटंबना केली,–
तो मुसळाचा शाप, ती लोहार्गला !–
अनर्गल सत्तेचंच फळ आहे समजलास ?

अक्रूर — महाराज, त्या लहान क्षुद्र भांडणांना–
आपल्यातल्याच,
आता भयंकर युद्धाचं रूप आलं आहे
वाटतं आता थांबतील ते निःपात करून
सर्व कुळाचा;
त्वरित बोलावलं आहे आपल्याला,
बलरामदादांनी.

श्रीकृष्ण — निघालोच आम्ही अक्रूरा,
तुम्ही निरोप करा तसा पुढे जाऊन
द्वारकेत, पण अक्रूरा, आधी हे सांग

कशी सुरुवात झाली याची.

अक्रूर – सांबाचं ते मुसल-प्रकरण द्वारकेशा,
माहितच आहे आपल्याला,
बलरामानं फेकून दिलं समुद्रात त्या मुसळाचं पीठ करून
नगरात द्वाही फिरवली कोणी कुठंही
मद्य पिऊ नये म्हणून, खरं ना उद्धवा?

उद्धव – हो. पण हे यादव, श्रीकृष्णा, गेले प्रभासवनात
आणि स्त्रियांसह प्याले मद्य
अभीरांच्या घरांतून लपवलेलं–
त्या धुंदीतच भांडणाला सुरुवात झाली

श्रीकृष्ण – पण कुरापत काय काढली अक्रूरा, भांडणासाठी?

अक्रूर – तसं काही विशेष नाही, नेहमीच्याच गोष्टी
शैनेय सात्यकीनं अंधक कृतवर्म्याला डिवचलं,
उपहास केला,
निद्रिस्त पांडुपुत्रांचा वध करणाऱ्या त्याच्या हीन शौर्याचा
कृतवर्म्यानं टोमणा दिला सात्यकीला उलट,
ठार केल्याबद्दल ध्यानस्थ भूरिश्रवाला,
झालं, सुरुवात झाली द्वंद्व-युद्धाला
त्यांच्या साह्याला आले भोज, अंधक, अभीर
आणि 'एरका'च्या गवती तरवारी:
हिरव्या लहरी लोकांच्या प्रक्षोभाच्या!

सत्यभामा–आणखी अक्रूरा, ते सांगा ना यांना; यदुनाथा,
तुमचाही उद्धार केला सात्यकीनं या भांडणात
त्यानं आरोप केला तुमच्यावर
स्यमंतकाच्या चोरीचा; म्हणाला,
तुम्हीच केलात वध माझ्या पित्याचा.

श्रीकृष्ण – अस्सं! सत्राजिताचा वध मी केला काय?
तो केला जांबुवंतानं हे सर्व जगाला माहीत आहे



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५५५
काव्य २५३३४
२।५।८८

अन् त्या वधाचा आरोप माझ्यावर करतो, आज,
हा सात्यकी ! इतकी मती भ्रष्ट झाली,
एवढा उन्मत्तपणा आला ! मग
मरणालाच योग्य आहेत हे यादव.

सत्यभामा—महाराज, शांत व्हा, विचार करा,
तुम्हीच त्यांना दंडायला निघालात संतापात
तर, मग कसं व्हायचं ?
कुणी या संहाराला आळा घालायचा ?
ही यादवी शांत करावी म्हणून सांगायला आले,
तुम्हीच संतप्त झालात,
शब्दांचा सूड शस्त्रानं घ्यायला निघालांत, तर—

श्रीकृष्ण — भामे, हे मदांध, आततायी,
उन्मत्तपणानं तुझा नि माझा अपमान करणारे,
हे यादव—नाही, त्यांना क्षमा नाही
प्रायश्चित्त मिळालंच पाहिजे त्यांना
ह्या अपराधाचं.
भ्रष्ट, उन्मत्त सत्ता नष्ट झाली पाहिजे
नाही, ही यादवी शांत होणार नाही
यादव गेले तरी उरणार ही यादवी
प्रत्येक युगात. चला, निघालो आम्ही
उद्धवा — अक्रूरा,—
आमच्या प्रस्थानाचे शंखनाद करा.

( शंखनाद-रथांचा गडगडाट-दृश्यांतराचे सूर )

## दृश्य चवथे

[ शंखनाद विरत असताना समुद्राच्या लाटांचा घोष चढत वाढत येतो. समुद्रकाठी, एका वृक्षातळी श्रीकृष्ण बसला आहे. ]

श्रीकृष्ण – हे शंखनाद विरण्यापूर्वीच
मी इथे येऊन पोचलो
पण त्यापूर्वीच बाणासारखा काळ पोचला होता जाऊन,
ह्या युगान्ताच्या सीमेवर
विसर्जनाच्या टोकावर.
युगान्ताचा क्षण, काळाचं एक टोक,
निश्चल भासणारं आपल्या अनिवार गतीत :
सोन्याच्या शरासारखं, स्थिर, सर्पमुख,
उभं आकाशाला भेदून,
ज्यावर थरथरत असतो अज्ञाताचा एक आरक्त थेंब
ज्ञाताचं सर्व अवकाश गिळून,
अश्रु पिऊन !
काळाच्या गतीत एक क्षण असा येतो, जड अचेतन,
जिथं गोठून जातं सारं चैतन्य,
एका दिशेनं, एका प्रेरणेनं सळसळत येणारं,
विजेसारखं;
गोठून जातं फुलांचं हास्य, सूर्याचं तेज
त्या गोठण्यात अपार वेदना असतात;
आज सहन करीत आहे मी
त्या साऱ्या वेदना युगान्ताच्या,
विसर्जनाच्या !
आवतीभोवती मरून पडले आहेत सारे यादव,
माझे आप्त, माझेच पुत्र-पौत्र,

माझ्याच काळजाचे छपन्न कोटी तुकडे,
आपल्याच शस्त्रानं छिन्नछिन्न झालेले
पलीकडून उठत आहेत यादव-स्त्रियांच्या किंकाळ्या-
मूढ, भयचकित, आकाशात पसरत आहेत
भोगाच्या आंतर्व्रणासारख्या !-
पुढं कोसळत आहेत हुडे-गोपुरे
सोन्याच्या द्वारकेची,
शकले उडत आहेत माझ्या सिंहासनाची,
जे मी उभारले होते साधूंच्या परित्राणासाठी,
धर्माच्या स्थापनेसाठी
या माझ्या स्वप्ननगरीत !
ते स्वप्नच कोसळून पडत आहे
मी आता वाट पहात आहे कशाची ?-
आणखी कशाची ?-
युगान्ताची की युगारंभाची ?
( एक बाण येऊन श्रीकृष्णाला लागतो. )
हाय !- की या- या बाणाची ?
हा घुसला पायात, कुणाचा बाण ?

व्याध — ( धावत येत ) माझा, माझा, प्रभो. क्षमा करा मला
माहित नव्हतं मला प्रभो, पण तो माझा बाण-
माझा-

श्रीकृष्ण — तुझा बाण ! तुझा बाण ? कोण तू ?

व्याध — मी जरा — जरा व्याध प्रभो, नीट दिसलं नाही
चूक झाली माझी- तो मी- माझा तो-
माझा बाण- तो प्रभो.

श्रीकृष्ण — तू जरा व्याध, आणि हा तुझा
बाण व्याधाचा ? ( हसतो ) की काळाचा ?

व्याध — नाही प्रभो, माझाच बाण तो

हरिण समजून बाण मारला–

श्रीकृष्ण – हरिण समजून बाण मारलास अं ! छान !
मी हरीण, तू व्याध, वा !
( उद्धव-अक्रूर बोलत येत आहेत. त्यांचे शब्द आता जवळ जवळ येतात. )

अक्रूर – तर उद्धवा, प्रभासवनात सोडले मी श्रीकृष्णांना
अन् द्वारकेत गेलो बलरामांना निरोप द्यायला
परत आलो तर श्रीकृष्ण दिसेनात
तेव्हापासून शोधतो आहे, अन् इकडे हा कल्पांत !
प्रेतंच प्रेतं मेलेल्या यादवांची
रक्ताचे पाट, रत्नमण्यांचे खच, बाणांची टोकं,
तलवारींचे तुकडे
आणि मांसात रुतलेली हिरवीगार लव्हाळी !
एरका ! हिरवे सर्प वैराचे !
रणक्षेत्र झालं प्रभासाचं आणि द्वारका झाली
एक भास, एक आभास, काळ्याकुट्ट अंधारात विरणारा,
केवढा संहार, कुरुक्षेत्रापेक्षाही भयंकर !
डोळे फिरताहेत, कुठं दिसणार भगवान श्रीकृष्ण
एवढ्या उत्पातात ?

उद्धव – सारं वन पाहात आलो आपण
कुठंच त्यांचा थांग लागत नाही
किती हिंडलो ? बोलता बोलता अक्रूरा,
तुझी श्रीकृष्णकथाही संपली,
परंतु काही शोध लागत नाही.

अक्रूर – कशाचा शोध लागत नाही म्हणतोस
उद्धवा ? श्रीकृष्णाचा ?
निसटून जायची सवयच आहे त्याला
कथेत काय, कुठंच सापडत नाही तो

ना वनात, ना मनात !
पण हा कसला शब्द येत आहे ?
कुणी बोलत आहे ह्या जाळीपलीकडे ?
ते पहा, त्या वृक्षाखाली–

श्रीकृष्ण – व्याधा, तू जा आता,
ते लोक इकडे येण्यापूर्वी.
छान हरिण समजलास मला उदा उदा !–

व्याध – चूक झाली माझी प्रभो.
पण किती सुंदर भास,
गुडघ्यावरील पीतांबरावर टेकलेला
आपला तो निळा निळा पाय, आरक्त तळवा,
वर निळी निळी बोटे, नभाच्या गाभ्याची,
वाटलं विसावलाय एक नीलकांत हरिण
बाण मारला मी, चूक झाली माझी–

श्रीकृष्ण – चूक म्हणजे, प्रचंड चूक.
त्रैलोक्याची पारध करणारा व्याध मी
हरिण वाटलो तुला !–बरोबर आहे,
हीच युगान्ताची लक्षणं असतील कदाचित–

अक्रूर – अरे ते पहा, श्रीकृष्णच आहेत ते
त्या वृक्षाखाली बसलेले
जवळ कोणी उभं आहे ?

उद्धव – कोण असेल तो ? काही समजत नाही इथून
चल, लवकर चल तिकडे
थकल्यासारखे दिसताहेत प्रभू.

व्याध – प्रभो, मला नीट दिसत नाही
म्हातारपणामुळं, क्षमा करा,
पोटाचा धंदा आहे माझा, हरिण मारणं.

श्रीकृष्ण – व्याधा, सांगितलं ना,

आधीच क्षमा केली आहे तुला. तू पोटासाठी हरिण मारतोस
आम्ही माणसं मारतो, उगाच–भुकेशिवाय !
माणसं काही कुणी खात नाही भुकेला, तरीही–
जा व्याधा, अभय आहे तुला.

व्याध – पण–पण तो बाण ?

श्रीकृष्ण – राहूदे तो, तो काही शब्द नाही
जखम करून परत–घ्यायला;
आणि तूही दुःख नव्हेस
जिव्हारी जखम करणारं,
अन् बाणच नव्हे, तर त्याची खूण पण घेऊन जाणारं !
जा आता, उशीर करू नकोस,
यादव असतील ते, तर
जिवंत ठेवणार नाहीत तुला
जा, पळ लवकर, ( व्याध जाऊ लागतो )

अक्रूर – ( पुढे येऊन ) कोण रे तू ? अन् कुठं चाललास
असा पळून चोरासारखा ?
पण हे काय प्रभो, आपल्या पायात
हा बाण कुठून रुतला ?

श्रीकृष्ण – बाण ? कुठला बाण ?

अक्रूर – तो काय, ह्या उजव्या पायात ?

श्रीकृष्ण – तो होय ? तो रुतला
चालता चालता–

उद्धव – नाही प्रभो, कुणीतरी मारला
या व्याधानंच मारलेला दिसतो

अक्रूर – खरंच, या व्याधानंच मारला असेल तो बाण

श्रीकृष्ण – म्हणून काय झालं ? तुम्ही यादवांनीच
मारावे सारे बाण असं थोडंच आहे !
केवळ तुम्हालाच अधिकार नाही बाण मारण्याचा

उद्धव — ते खरं, पण तुम्ही का वाचवताय त्याला
का क्षमा करताय त्याला प्रभो ?
किती खोल रुतलाय पायात तो बाण !

श्रीकृष्ण — अरे उद्धवा, तुम्ही माणसांनी
असंख्य बाण मारलेत मला
भात्याचे संपले तर शब्दांचे मारलेत !—
ह्यानं तर एकच बाण मारला
अन् तोही चुकून, नाही का व्याधा ?

व्याध — होय प्रभो, चुकून, अगदी चुकून
हरिण समजून—

अक्रूर — हरिण समजून, चांडाळा, थांब, हरिण समजून काय ?
तुझाही अजापुत्र करून टाकतो एका क्षणात !

श्रीकृष्ण — हां, अक्रूरा हात आवर
हे क्रूरपण शोभत नाही तुझ्या नावाला.
जा व्याधा, जा, माझं तुला अभय आहे ( व्याध जातो )
अक्रूरा— उद्धवा, आता माझं ऐका,
ह्या व्याधाचा काही दोष नाही,
शक्तीही नाही त्याची
त्या मुसळाच्या तुकड्यापासून
त्यानं हा बाण केला होता,
समुद्रात, माशाच्या पोटात सापडला
त्याला तो तुकडा,
तेव्हा त्या मीनकेतनाचा
प्रत्यक्ष प्रलयंकर महाकालाचा हा बाण,
त्याचा प्रहार कसा चुकवणार मी ?
समजा हे केवळ निमित्त
टळणार नाही युगान्ताची हाक
जा, तुम्ही दुःख करू नका

आता आपल्या घरी जा.

अक्रूर — आम्ही जायचं, तुम्हाला इथं टाकून?
तसाच ठेवून हा बाण?

श्रीकृष्ण — इतकंच? मग तो काढून जा,
माझ्या पायात रुतलेला हा बाण
शोभत नाही मला, नाही का?
उत्पत्ती-स्थिती–लयकर्ता मी काल, मी हंता,
एका व्याधाच्या बाणानं विद्ध झालो! हूं:
(हसतो)

उद्धव — असं का बोलता प्रभो?
का लाजवता आम्हाला?

अक्रूर — परंतु प्रभो, एक सांगा
हा विनाश टाळता आला नसता का?
पदरात घालायच्या होत्या आमच्या चुका,
पण हा विनाश! प्रभो, गोकुळातून
तुम्ही बाहेरच आला नसतात तर! —
रमला असतात त्या वृंदावनात
त्या गोधनांत, मुरलीच्या स्वरसाधनेत
राधेच्या प्रिय भाषणात, यमुनेच्या कलरवात
आणि रासाच्या नृत्यगायनात—
डोंगरावरून झरणाऱ्या चांदण्यासारखे
यमुनेवरून वाहणाऱ्या पवनासारखे! — तर—
पण मीच करंटा, मीच निघालो
तुम्हाला घेऊन, गोकुळातून, द्वारकाधीशा—

श्रीकृष्ण — अक्रूरा,— वेडा आहेस
तुला असं वाटतं का
टळला असता हा विनाश,
गोकुळातून तू मला आणलं नसतंस तर!

गोकुळातून निघताना अक्रूरा,
तुला कल्पनाही आली नसेल की
अंती आपण इथं पोचू,
या बाणाच्या टोकाशी,
या बुडत्या स्वप्नाच्या नगरीशी,
कालसमुद्राच्या काठाशी,
जळवायूने कोरलेल्या अवकाशातल्या
काळ्या भयाण शून्याशी !–
एका भकास जागृतीच्या किनाऱ्याशी !–

अक्रूर – श्रीकृष्णा, मनमोहना, हे बोल
घरं पाडतात माझ्या काळजाला.
गोकुळातून तुम्हाला मी आणलं,
खरोखरच, ही चूक झाली माझी
असं वाटतं मला.

श्रीकृष्ण – शांत हो, अक्रूरा,
नसती शंका घेऊ नकोस,
तुझा काही दोष नाही ह्यात,
चूक, अचूक असं काही नसतं जीवनात
जीवन असतं एक कर्तव्य,
कर्तव्याचा एक क्षण, त्या क्षणाची आणीबाणी–
आरूढ व्हयचं त्या क्षणावर
( तेव्हा मी तुझ्या रथावर आरूढ झालो होतो ना,–तसा ! )
आणि आपलं कर्तव्य करायचं
फलाची आशा न धरता अन् एकदा
त्या क्षणीचं कर्तव्य केलं, की माणूस,
बंदीवान होतो त्या क्षणाचा;
त्या क्षणाच्या, त्या ध्येयाच्या दात्यांत सापडतो तो
वाहात जातो प्रवाहात,

जेव्हा त्याला वाटत असतं– ठाम–
आपण उभे आहो आपल्या ध्येयाच्या माथ्यावर !

अक्रूर – परंतु महाराज, आपण बाहेर पडलात
कंसवधासाठी, शिवाच्या – सत्याच्या रक्षणासाठी,
आपण केलंत ते चांगलंच केलंत,
शिव, मंगलच केलंत जगाचं, मग
आपल्याला का पाहावा लागला
हा विनाश ?

श्रीकृष्ण – कारण, मला दिसलं नाही,
आकळलं नाही संपूर्ण– जीवन
अक्रूरा, जगात निखळ चांगलं, निखळ शिव, मंगल,
असं काही नसतं,
सत्य-असत्य, भव्य-क्षुद्र, मंगल-अमंगल
यांनी हे जीवन आकाराला येतं
त्यांत मिसळतात आपली दिव्य ध्येयं, आपल्या आकांक्षा,
कालवतात त्यात आपल्या क्षुद्र इच्छा,
आपले स्वार्थ, आपले काम क्रोध,
आणि या सर्वांची बेरीज-वजाबाकी करता करता,
बहुधा हाती शून्य उरतं शेवटी
आता हेच पहा,
द्वारकेची ही सत्ता मी स्थापन केली
साधूंच्या, धर्माच्या परित्राणासाठी
पण ती सत्ताच भ्रष्ट झाली,
काम-मोहाच्या पाशात सापडून
अंध झाली स्वार्थानं, विलासानं
उन्मत्त बनली, येऊन पोचली
विनाशाच्या टोकावर अपरिहार्यपणे,
अर्थच नष्ट झाला सत्तेतला,

सत्त्वाच्या त्राणासाठी झटणारी ती सत्ता—
पण तिनंच गिळायला सुरुवात केली
साऱ्या अस्तित्वाला
म्हणूनच आता अटळ आहे नाश
त्या सत्तेचा, साऱ्या यादवांसह,
म्हणूनच मी भोगतो आहे मुकाट
अपत्यनाशाच्या कोटी कोटी यातना
त्या अपत्यांबरोबर करीत आहे मीही
स्वतःचं विसर्जन, अक्रूरा—

अक्रूर — पण, नारायणा, आपली कृति विशाल आहे
आपली प्रतिभा अनंत आहे
तिच्या सर्जनाला मर्यादा नाहीत
हा नाश टाळणं शक्य होतं आपल्याला

श्रीकृष्ण — अक्रूरा, प्रत्येक कृतीच्या, प्रत्येक प्रतिभेच्या
सर्जनाचाही एक वेग असतो
तो वेग संपला की विनाश सुरू होतो
तोच युगान्त. त्यातूनच होतो पुन्हा
नवीन युगारंभ.
विसर्जनात हरवतो सर्जनाचा अर्थ
आणि सापडतोही,—
राधेला प्रेमात सापडला तसा !—
हो — राधा. ती येते म्हणाली होती ?—
तिची वाट पाहात थांबणार आहे मी,
अक्रूरा, जाताना,
एवढा हा बाण मात्र काढून घे.
फार रुततो आहे तो पायात.

अक्रूर — प्रभो, हा बाण काढला की—

श्रीकृष्ण — अक्रूरा, मी म्हणतो बाण काढून घे,

उपस तो बाण न् जा तुम्ही.
उद्धव/अक्रूर – प्रणाम प्रभो, प्रणाम वासुदेवा, प्रणाम;
जातो आम्ही. ( जातात )
श्रीकृष्ण – गेले हे उद्धव अक्रूर–विझत्या आशेसारखे,
अन् पायातले शल्यही गळालं सरत्या कर्तव्यासारखं !
पण मनातलं शल्य ! ते गळत नाही
अधिकच खोल जातं ते,
कधी त्याची फुलं होतात,
कधी व्यथा.
आता उरलो मी, एकटा, एकाकी,
फांदीवरील फुलासारखा, फुलावरील
आकाशासारखा
राधेच्या तृप्त हृदयातील गीतासारखा ?–
कदाचित् व्यथेसारखा त्या गीतातल्या–
परंतु राधा, राधा कुठं आहे ?
कुठं आहे ती ? ती येते म्हणाली होती ना,
मी आठवण केल्याबरोबर ?
परंतु हे असं काय होतंय ?
स्वरासारखी झाडं वरवर जाताहेत !
चांदणं झिरपत आहे माझ्या रक्ताच्या थेंबाथेंबांतून
अन् हे आकाश खाली येत आहे
माझ्या मनासारखं, माझं मनच होऊन,
त्याच्या गाभाऱ्यात भरून राहिले आहेत
मातीचे गंध, कालिंदीचे स्पंद
मंद–मधुर सूर वेणूचे,–
बालपणी ऐकलेले, श्वासांनी फुलवलेले
मी स्वतःच कधी,
राधेच्या सहवासात–तिच्या निश्वासांत–

( वेणूचे स्वर आसमंतात भरतात. )
पण राधा ? — ती आली नाही
शेवटी ती आलीच नाही ( सुस्कारा )

**राधा** — नाही कशी ? ही मी आले
पहा, डोळे उघड, मी आले आहे
तू आठवण करताच आले आहे
मी राधा आले आहे, गोपाला,
तुझी राधा—

**श्रीकृष्ण** — राधा—राधा ? तू आलीस राधा ?
गोकुळातली राधा ?
माझ्या बाळपणातली राधा !
माझ्या मुरलीच्या स्वरातली राधा !
शून्यातली मोहनबाधा ! तू आलीस !
पण मी तुझा गोपाल नाही,
मी आहे द्वारकाधीश, श्रीकृष्ण !—
अष्टनायिकांच्या सहवासात एकाकी असलेला,
यादवांच्या प्रेतांच्या ढिगाऱ्यात,—
एकटा पडलेला
पाकळ्यांत कोंडलेल्या भ्रमरासारखा
भ्रमरामधल्या गाण्यासारखा;
मागे विनाशाचा तिमिर दाटला आहे
पुढे पसरला आहे नियतीचा दाट अंधार :
हेतूच्या अभावातून जन्मलेला
असतेपणातला अर्थ गमावलेला
अंधार—अंधार—

**राधा** — त्या अंधारालाच अर्थ द्यायला
आले आहे मी वृजलाला.

**श्रीकृष्ण** — आता कशा-कशाला अर्थ देणार तू राधे ?—

सोन्याची द्वारका धडधडा कोसळत आहे
समुद्रात बुडत आहे
छपन्न कोटी यादव मरून पडले आहेत
धर्मसिंहासन नष्ट झालं आहे
कर्मे लुप्त झाली आहेत आपल्याच प्रेतांच्या ढिगाऱ्यांत—
यांना काय अर्थ देणार ?
जीवनाच्या विध्वंसाला
मनाच्या या उद्ध्वस्ततेला
कसला अर्थ देणार तू ?

राधा — माधवा, तसा बाहेर नसतोच अर्थ !—
तो असतो स्वतःच्या आतच
तिथं त्याला शोधायला हवं
आठवतं तुला नंदलाला,
तू गोकुळ सोडून निघाला होतास,
तेव्हा मी म्हटलं होतं—
(राधेचे शब्द — स्मृतीतले, घुमणारे प्रतिध्वनीसारखे)
" नाही, नाही, माधवा नाही,
तुझा विरह चालेल, पण तुझ्या प्रेमाचा मृत्यू
नाही, तो मला सहन होणार नाही,
माधवा, सहन होणार नाही रे.—"

राधा — तो प्रीतीचा अर्थ त्या गोकुळात नव्हता
वृंदावनात नव्हता, रासात नव्हता
चांदण्यात नव्हता, माझ्या देहात नव्हता
की तुझ्यातही नव्हता,
तो होता माझ्या अंतःकरणात :
फुलांतल्या सुवासासारखा, अदृश्य;
तोच अर्थ आज मी इथं घेऊन आले आहे

श्रीकृष्ण — राधे, आता फार उशीर झाला त्या अर्थाला

त्या वेळी का आली नाहीस द्वारकेत ?
मथुरेत का आली नाहीस ?

राधा — का कुणास माहीत ? आले नाही.

श्रीकृष्ण — पण त्या वेळी हे तू का बोलली नाहीस ?
राधे, तेव्हा — तेव्हा—
यमुनेच्या डोहात बुडायच्या गोष्टी केल्यास
कालियाच्या मुखात जायला तयार झालीस
त्या वेळी — त्या वेळी — राधे—

राधा — त्यावेळी मुकुंदा, हे मला कळत नव्हतं
ते वयच नव्हतं तसं माधवा,
त्या वेळी प्रेम करायचं कळत होतं,
प्रेम मागायचं कळत होतं;
पण त्या प्रेमाचा अर्थ कळत नव्हता

श्रीकृष्ण — पुष्कळ गोष्टी फा ऽ र उशीरा कळतात
आणि हा उशीर राधे—
त्यातच शोकांतिका आहे मानवी जीवनाची
तू जो अर्थ आपल्या उरात पाहिलास,
तो मी बाहेर शोधीत होतो :
मल्लांच्या उत्तुंग बाहुताडनात
जरासंधाच्या तनूत्पाटनात
त्याच्या महाद्वारीच्या घनघोर भेरी-भंगात
अष्टनायिकांच्या फुलमाळांत
स्यमंतकाच्या रत्नशलाकांत
पांडवांच्या वनवासात
द्रौपदीच्या विस्कटल्या केसांत
दुर्योधनाच्या ऊरुभंगात, धर्माच्या परित्राणात
शंखचक्रात, गदापद्मात
पुरुषोत्तम वासुदेवाच्या वैजयंतीमाळांत—

पण तो अर्थ कुठंच सापडला नाही,
कुठंच नाही;– उलट तो अधिकच हरवला !
राधे, त्या वेळी तू का आली नाहीस ?

राधा – त्या वेळी आले नाही ते बरंच झालं
मलाही तू हरवून टाकलं असतंस मुकुंदा !–
हरण्या-हरवण्याच्या कसल्या गोष्टी करतोस
हे बोलणं शोभत नाही तुला,
गीता सांगणाऱ्या भगवंताला.
घे, ही वेणु घे, आणि वाजव ती माधवा–
तिच्या सुरांत सापडेल तो अर्थ
कदाचित्–

श्रीकृष्ण – धन्य आहेस, राधे, तू धन्य आहेस,
उगाच नाही म्हणत लोक–
तू माझा गुरू आहेस म्हणून,
हे सूरच खरे आहेत; या आभाळासारखे
या जळासारखे
जाईजुईच्या फुलांसारखे, पाखरांसारखे
तुझ्या हंसऱ्या कुंडलांसारखे, त्याहूनही
तुझ्या उरातील प्रीतीसारखे, खरे, अगदी खरे.
हे प्रेम कधी मिळतं, कधी मिळत नाही,
पण त्यात असतात अनंत सर्जने,
सर्जनाचे प्राणमंत्र–

राधा – हां हां, गोपाळा थांब, थांब–
ही सर्जने-तर्जने काही मनात आणू नकोस
फक्त ही मुरली वाजीव
मी शांतपणे ऐकते
वाहू दे ते सूर, पसरू दे ते चांदणे
दुःखकालिंदीच्या काठाकाठाने

झरू दे या झाडांतून चांदण्याचे ते कवडसे,
कवडशांच्या शपथा
कुजबुजू दे या पानापानांतून
वाजीव ती मुरली, फुलव ते सूर,
चांदण्याच्या चोळीचाही ज्याने दाह होतो,
आळव ते आलाप,
बारा गाव वणवे ज्याने शांत होतात,
मग बरसतात श्रावणधारा
जळत्या गोवर्धन पर्वतापाशी
मुरलीधरा, ते सूर छेड
गांधाराचे आरोह भिडू दे निषादाला,
विषादाला विसरून, रेलताना धैवतावर,
धूसर जीवनाच्या
गोविंदा, कणाकणांतून, नसानसांतून
हिंदोळू दे ते सूर, धुंद मंथर,
अन् मग माझ्या डोळ्यांत पहा
त्या स्वरांचा आनंद, शिंपल्यातल्या मोत्यांसारखा
थरथरणारा–
खवळलेल्या समुद्राच्या तळाशी–
हं, वाजीव ती मुरली मोहना.

श्रीकृष्ण – खरंच, राधे, भेटेल तो आनंद मला
शिंपल्यातल्या मोत्यासारखा,
या खवळलेल्या सागराच्या तळाशी? खरं हे ?—
की त्या मोत्यांच्या पाण्यातही असते
दुसरे एक तुफान, गोठलेले–अश्रूंचे !
असूदे, नसूदे–
वाजवतो वेणू मी
राधे, राधिके, आण ती वेणू

कुठं आहे, कुठं आहे ती वेणू ?
राधे, राधे ऽ ऽ–राधे !–
आणि राधा तरी कुठं आहे ?
ती आली नाही, की गेली नाही–
मग मी तरी कुठं आहे ?–
मी श्रीकृष्ण मेघासारखा गर्जून, वरसून,
पूर्ण होणारा आपल्या रितेपणात,–
तो मी तरी कुठं आहे ?–
मी आहे एक अकाल कल्पना :
हिरण्यगर्भ,
सवितृमंडलातून स्फुरणारी,
सोन्याच्या रथात बसून येणारी,
–शून्यापासून निर्शून्यापर्यंत–
फडफडणारी, गरुडध्वजाप्रमाणे
असीम दिगंतात, मोरपंखी !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

## शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ५९ | १४ | वक्षावरली | वृक्षावरली |
| १३ | १३ | निःशून्यापर्यंत | निर्शून्यापर्यंत |

' संस्कृत ' प्रेमी

कॉन्टिनेन्टल

वा च कां सा ठी

REFBK-0025334

**मेघदूत** ( साकीबद्ध अनुवाद ) रा. प. सबनीस
**रघुवंश** ( सर्ग १४ ) सं. प्रा. वसंत पाटील व प्रि. द. गं. कोपरकर
**वेणीसंहार** सं. डॉ. गो. के. भट व प्रा. रं. ना. गायधनी
**रत्नावली** सं. डॉ. के. ना. वाटवे व प्रा. रं. ना. गायधनी
**दहा धाडसी कुमार** ( दशकुमारचरितम् ) अनु. वि. कृ. श्रोत्रिय
**वेदातील गोष्टी** ( भाग १, २ ) वि. कृ. श्रोत्रिय
**रामायण कथा** ( सार ) त्र्यं. ग. बापट
**महाभारत कथा** ( सार ) त्र्यं. ग. बापट

**भारतीय तत्त्वज्ञान** : डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे
**संस्कृत नाट्यसृष्टी** : डॉ. गो. के. भट
**महर्षी वेदव्यास** : कृ. के. कोल्हटकर
**हस्तीनापूर** : म. रं. शिरवाडकर
**श्री गीता भाष्यार्थ प्रकाश** : पं. द. वा. जोग

**कौन्तेय** ( नाटक ) वि. वा. शिरवाडकर
**माता द्रौपदी** ( नाटक ) विद्याधर पुंडलिक
**मृत्युंजय** ( कादंबरी ) शिवाजी सावंत
**मरणगंध** ( महाभारताधारित नाट्यकाव्ये ) वा. रा. कांत